




RNI No. 6153/57

# समाचार
SAMACHAR








Volume - 72 | Issue- 206 | Marathi Daily | Tuesday 23/4/2024 | Pages - 6 | Price- Rs. 3



अग्रलेखः शेअर बाजाराचा वेलू गगनावरी पान २



आनंद बालसंस्कार शिबिरास प्रतिसाद पान ५



डॉ. श्रध्दा व सृष्टी जगताप यांच्या सुरेल सुरांना उपस्थितांची दाद पान ६


## उठाठेव

– विवेक मेहेत्रे



आज दिवसभरात एकाही राजकीय नेत्याने मीडियासमोर एकही वादग्रस्त विधान केलं नाही... दर्शकांच्या गैरसोयीबद्दल आम्ही दिलगीर आहोत!!

# निवडणुकीचा पारा चढला....!

**ज्ञानेश कुलकर्णी**

यंदा तापमानाचा पारा मार्च महिन्यापासूनच चढला असला तरी नगरच्या निवडणुकीचा पारा खऱ्या अर्थाने गेल्या काही दिवसांपासून चढायला सुरुवात झाली आहे. काल महायुतीचे उमेदवार भाजपाचे डॉ. सुजय विखे यांनी शहरातून जोरदार शक्ती प्रदर्शन करत मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल केला. काल शहरात सकाळपासून महायुतीच्या कार्यकर्त्यांची लगबग दिसून येत होती. सकाळी छत्रपती शिवाजी पुतळ्यापासून सुरू झालेल्या रॅलीमध्ये भाजपाबरोबरच राष्ट्रवादी (अजित पवार गट) आणि एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या रॅलीने शहरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले. रॅली मार्गावर रस्त्याच्या दुतर्फा नागरिकांनी देखील चांगलीच गर्दी केली होती. त्याचे कारणही कदाचित नागरिक रॅलीमध्ये मुख्यमंत्री शिंदे आणि फडणवीस यांना अपेक्षित धरत होते. कालच्या रॅलीमध्ये उमेदवार डॉ. सुजय विखे यांच्या बरोबरीने आमदार संग्राम जगताप यांचे देखील मोठे शक्ती प्रदर्शन पहावयास मिळाले. रॅलीतील जगतापांच्या कार्यकर्त्यांचा उत्साह पाहता आगामी विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराची नांदी म्हणावयास हरकत नाही. रॅलीची सांगता सभेने झाली. त्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आवर्जून उपस्थित राहणार असल्याने सभेविषयी नागरिकांच्या मनात मोठी उत्सुकता होती. परंतु दुसरे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची अनुपस्थिती चर्चेचा विषय होती. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी आपल्या भाषणातून कार्यकर्त्यांमध्ये मोठे चैतन्य निर्माण केले. परंतु ऐन उन्हात सभा झाल्याने त्याचा गर्दीवर काहीसा परिणाम पहायला मिळाला. आजवरच्या निवडणूक प्रचाराच्या सभेंच्या इतिहास पाहता प्रथमच पारंपरिक गांधी मैदान हे स्थळ सोडून चौपाटी कारंजा सारख्या अडचणीच्या जागी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांची सभा घेण्यात आली. त्याचे कारण बहुधा स्वा. सावरकरांच्या आदर्शांचा गौरव करुन त्यांना अभिवादन करण्यासाठी त्यांच्या पुतळ्याशेजारी विशेष करुन सभेचे आयोजन केले असावे असा नागरिकांचा अंदाज होता. परंतु सभेदरम्यान एकाही वक्त्याने स्वा. सावरकरांना अभिवादन केले नाही. कदाचित आयोजकांकडून व्यासपीठाशेजारी स्वातंत्र्यवीरांचा पुतळा असल्याबद्दल लक्ष वेधले गेले नसावे. असे असले तरीही काल महायुतीचे उमेदवार डॉ. सुजय विखे यांच्यासाठी मोठी वातावरणनिर्मिती झाली यात शंका नाही.

मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी वातावरणनिर्मिती केलेली असतानाच चार दिवसांपूर्वी राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाचे सर्वेसर्वा, माजी केंद्रीय मंत्री आणि माजी मुख्यमंत्री शरद पवार यांचा नगर दौरा देखील विशेष चर्चेत राहिला. शुक्रवारी दि. १९ एप्रिल रोजी शरद पवार यांनी नगरमधील राजकीय वातावरण चांगलेच पिंजून काढले. शरद पवार यांनी दिवसभरात मतदार संघातील विविध संस्था, संघटना यांच्या भेटीगाठी घेऊन त्यांचे प्रश्न, समस्या आणि अपेक्षा बारकाईने समजून घेत त्यांच्याशी संवाद साधला. अनेक वर्षानंतर गांधी मैदान येथे झालेल्या सभेत देखील रोड शो च्या माध्यमातून वातावरण निर्मिती केली. या सभेला त्यांच्या समवेत शिवसेना (ठाकरे) गटाचे आदित्य ठाकरे आणि राष्ट्रवादीचे खासदार अमोल कोल्हे देखील उपस्थित होते. यावेळी राष्ट्रवादी बरोबर ठाकरे गटाची शिवसेना आणि काँग्रेसचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांची मोठी उपस्थिती होती. त्यादिवशी शरद पवार नगरमध्ये मुक्कामी असल्याने रात्री उशिरापर्यंत पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या भेटी चालू होत्या. शरद पवारांची जिल्ह्यामध्ये मोठी यंत्रणा आहे. त्यांना मानणारांची संख्या देखील मोठी आहे. त्यामुळे त्यांच्या या दौऱ्याला विशेष महत्व प्राप्त झाले होते. मागील दोन निवडणुका बघता प्रथमच शरद पवारांनी नगर दक्षिण मतदार संघासाठी दिलेला एवढा वेळ नक्कीच अनेकांच्या भुवया उंचावणारा आहे.

एकंदर नगर दक्षिण लोकसभा मतदार संघातील राजकीय हालचालींना वेग आला हे निश्चित. डॉ. सुजय विखे हे विद्यमान खासदार असून दुसऱ्यांदा ही निवडणूक लढवत आहे. तर निलेश लंके हे पहिल्यांदाच आपले नशीब आजमावत आहेत. निलेश लंके हे पारनेर-नगर मतदार संघाचे आमदार होते. साधारणपणे कुठलाही उमेदवार निवडणुकीत जिंकल्यानंतर विद्यमान पदाचा राजीनामा देतात. परंतु लंके त्याला अपवाद ठरले. प्रथम विधानसभेच्या सदस्यत्वाचा राजीनामा देत त्यांनी लोकसभेचे शिवधनुष्य उचलले आहे. यावरुन त्यांचा निग्रह, आत्मविश्वास याची प्रचिती येते. अर्थात यामागे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या तांत्रिक कारवाईचा धाक असला तरी लंकेंनी उचललेले पाऊल कौतुकास्पद आहे. प्रस्थापित म्हणून विखेंसाठी ही लढत प्रतिष्ठेची आहे. तर सर्वसामान्य कार्यकर्ता ते आमदार असा प्रवास करणाऱ्या निलेश लंकेंसाठी ही निवडणूक आव्हानात्मक आहे. जिथे विखे यांनी महिलादिनाच्या कार्यक्रमांच्या माध्यमातून तालुका तालुक्यांमध्ये दिग्गज **(पान ३ वर)**

## निवडक

### सातारच्या बदल्यात अजित पवार गटाला राज्यसभा

**मुंबई ,दि. २३-** १ लोकसभेची सातारची हक्काची जागा उदयनराजे भोसले यांच्या उमेदवारीसाठी भाजपला सोडल्यानंतर अजित पवार गटाच्या वाट्याला राज्यसभेची जागा मिळणार आहे. तसे आश्वासन भाजपाने दिल्याची माहिती अजित पवार गटाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी मुंबईत पत्रकारांशी बोलताना दिली. अजित पवार गटाला केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांची राज्यसभेची जागा देण्याचे आश्वासन भाजपाने दिले आहे. गोयल भाजपाकडून मुंबई उत्तर मतदारसंघातून लोकसभा निवडणूक लढवत आहेत. गोयल जून २०२२ मध्ये राज्यसभेवर निवडून गेले आहेत. जर गोयल विजयी झाले तर ते राज्यसभेचा राजीनामा देतील आणि त्यांच्या राज्यसभा खासदारकीची शिल्लक असलेली चार वर्षे अजित पवार गटाच्या उमेदवाराला मिळतील.

# निलेश लंके यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**समाचार/नगर-दि.२३**

हनुमान जयंतीचा मुहूर्त साधत महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके आज आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी त्यांनी कोणतेही शक्तीप्रदर्शन न करता उमेदवारी अर्ज भरला. आमदार प्राजक्त तनपुरे, ज्येष्ठ नेते दादाभाऊ कळमकर, ॲड. प्रताप ढाकणे, प्रा. शशिकांत गाडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष जयंत वाघ, माजी जिल्हा परिषद सदस्य संदेश कार्ले, माजी महापौर अभिषेक कळमकर, भगवान फुलसौंदर, संजय शेंडगे, शहर काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष किरण काळे, ठाकरे गटाचे शहरप्रमुख संभाजी कदम यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. प्रसार माध्यमांशी बोलताना ते म्हणाले की, मतदारसंघातील जनतेची आपल्याला साथ आहे. त्यामुळे आपला विजय निश्चित आहे.



(छाया- राजू खरपुडे)

दरम्यान, अर्ज दाखल करण्यापूर्वी निलेश लंके यांनी आज सकाळी हंगा (ता. पारनेर) येथे कुटुंबियांचे दर्शन घेतले. त्यानंतर महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांसह ते उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी नगरकडे रवाना झाले. नगरमध्ये आल्यानंतर त्यांनी शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणपतीचे दर्शन घेतले. त्यानंतर श्री विशाल गणपतीची आरती करण्यात आली. तेथून ते सर्जेपुरा येथील दक्षिणमुखी हनुमान मंदिरात पोहोचले. तेथे हनुमानाचे दर्शन घेतल्यानंतर उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी ते जिल्हाधिकारी कार्यालयाकडे रवाना झाले. निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ यांच्याकडे त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. दरम्यान, नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघात भाजपाचे उमेदवार खा. सुजय विखे आणि शरद पवार गटाचे उमेदवार निलेश लंके यांच्यात सरळ लढत होत आहे. खा. विखे यांनी काल (सोमवारी) मोठे शक्तीप्रदर्शन करीत उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील उपस्थित होते.




## गावठी कट्टा बाळगणारा जेरबंद

**समाचार/नगर-दि.२३**

गावठी कट्टा बाळगणाऱ्यास बेलवंडी फाटा परिसरातून स्थानिक गुन्हे शाखेने जेरबंद केले.

पोलिस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार संतोष लोढे, रवींद्र कर्डीले, रविंद्र घुंगासे, सागर ससाणे, मच्छिंद्र बर्डे, अमोल कोतकर, संतोष खैरे यांच्या पथकाने ही कारवाई केली. पोनि आहेर यांना माहिती मिळाली की, एक इसम विनापरवाना गावठी कट्टा विक्री करण्याचे **(पान ३ वर)**

### ६ जनावरांची सुटका; दोघे ताब्यात; एलसीबीची कारवाई

## जेऊरमध्ये सहाशे किलो गोमांस पकडले



**समाचार/नगर-दि.२३**

गोमांस आणि गोवंशीय जनावरांची वाहतूक करणाऱ्या दोघांना स्थानिक गुन्हे शाखेने ताब्यात घेतले. ही जेऊर (ता. नगर) येथे करण्यात आली. या कारवाईत १२ लाखाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

पोलिस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक तुषार धाकराव, अंमलदार संदीप पवार, सचिन अडबल, संतोष लोढे, रोहित मिसाळ, शिवाजी ढाकणे, रणजित जाधव, भाऊसाहेब काळे, संभाजी कोतकर यांच्या पथकाने ही करवाई केली. सलमान शेख हा एका पांढऱ्या रंगाच्या कारमधून व आवाईज कुरेशी हा त्याच्याकडील पिकअपमधून जेऊर (ता. नगर) येथून **(पान ३ वर)**

### पालकमंत्री विखे यांची शरद पवारांवर टीका

## दहा जागा लढवणारे देशाचे भवितव्य कसे घडवणार

**समाचार/नगर-दि.२३**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश आज महासत्ता बनत आहे. त्यांचे नेतृत्व आता विश्वमान्य झाल्यामुळेच देशाचे भवितव्य घडणार आहे. केवळ दहा जागा लढविणारे देशाचे भवितव्य घडवू शकणार नाहीत, अशी टीका पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी शरद पवार यांच्यावर नाव न घेता केली. जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्र अधिक विकसीत करण्याचा आपला प्रयत्न असून, आपली भूमिका उद्योग व्यवसाय आणण्याची आहे. इतरांसारखी दडपशाही करुन घालविण्याची नाही, असेही ते म्हणाले.



पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथे आयोजित कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात मंत्री विखे बोलत होते. यावेळी जेष्ठनेते खिलारी गुरुजी, सुजीत झावरे, तालुकाध्यक्ष राहुल शिंदे, मंगलदास बांदल उपस्थित होते. विखे म्हणाले की, उध्दव ठाकरे मुख्यमंत्री असताना अडीच **(पान ३ वर)**

### हनुमान जन्मोत्सव उत्साहात

## शहरातील मंदिरांमध्ये दर्शनासाठी मोठी गर्दी

**समाचार/नगर-दि.२३**

नगर शहरात हनुमान जयंती आज मोठ्या उत्सहात व भक्तिपूर्ण वातावरणात साजरी झाली. शहरातील हनुमान मंदिरांवर आकर्ष विद्युत रोषणाई करण्यात आली होती. पहाटेपासूनच भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. ठिकठिकाणी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. बजरंग बली की जय या जयघोषाने शहर दुमदुमून गेले होते.

अयोध्येत श्रीराम मंदिर झाल्याने नुकतीच श्रीराम नवमी मोठ्या उत्साहात साजरी झाल्यानंतर आज रामभक्त हनुमानाचाही जन्मोत्सव शहरात मोठ्या उत्साहात व भक्तीपूर्ण वातावरणात साजरा झाला. शहरातील हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेले सर्जेपुरा येथील दक्षिणमुखी हनुमान मंदिरात आज सूर्यदय वेळी हनुमान जयंती भक्तिभावाने साजरी झाली. यानिमित्त पहाटे हनुमानाच्या मूर्तीला महाभिषेक व विधिवत पुजा करून हनुमान चालीसा पाठ, श्रीराम नामाचा जप व आरती करून हनुमानाचा जन्मोत्सव साजरा करण्यात आला. बरोबर सुर्यदयाच्या वेळी उपस्थित शेकडो भाविकांनी जय श्रीराम... जय श्री हनुमान... असा जयजयकार करत पाळणा हलवून हनुमानाचा जन्मोत्सव साजरा केला. श्री हनुमान जयंतीनिमित्त येथील मंदिरामध्ये पहाटे पासूनच भाविकांची दर्शनासाठी लगबग सुरू होती. यानिमित्त मंदिरात अंतर्गत सजावट व मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई **(पान ३ वर)**




सकल राजस्थानी युवामंच (ट्रस्ट) व महिला मंच * महावीर इंटरनॅशनल, अहिल्यानगर

हाडांची झीज व हाडे ठिसुळ होऊन भुगा होण्यापेक्षा मशिनद्वारे कॅल्शियम तपासणी करा..

कॅल्शियम तपासणी शिबिर

कंबरदुखी, गुडघेदुखी व वात रुग्णांसाठी उपयुक्त

~~₹1000~~ ची तपासणी — फक्त ₹400

पहिल्या येणाऱ्या २० रुग्णांना मोफत कॅल्शियम तपासणी

दररोज फक्त ५० रुग्णांची तपासणी. नावनोंदणी आवश्यक.

कालावधी : १ एप्रिल ते ३१ मे २०२४, दररोज दुपारी १२ ते ५

डॉ. संदीप सुराणा एम.एस., ऑर्थो, गोल्ड मेडलिस्ट डॉ. अक्षय फिरोदिया डी.एन.बी. मेडिसीन

सिटी केअर - रुबी हॉल क्लिनिक प्रा.लि.

विराज इस्टेट, तारकपुर बस स्टॅण्ड, तारकपुर, अहमदनगर - ४१४ ००१ Ph.No. : 0241-2329105/06/07/08

एक्स-रे रु. 200/- | एम.आर.आय. रु. 2100/- | 2D ECHO रु. 500/- | सिटी स्कॅन रु. 1000/- | मणक्यावरील ओझन ब्लॉक रु. 5000/-

या शिबीरात * ई.सी.जी. मोफत * शुगर मोफत * रक्त, लघवी तपासणीसाठी ५०% सवलत.

संपर्क : 80555 54155 * सर्व कॅशलेस सुविधा उपलब्ध.

## संपादकिय

# शेअर बाजाराचा वेलू गगनावरी

मुंबई शेअर बाजाराच्या निर्देशांकाने प्रथमच ७५ हजार अंशांचा ऐतिहासिक टप्पा ओलांडला होता. नंतर दोन दिवस बाजारात पडझड झाली, तरी ते करेक्शन आहे. निवडणूक निकालापर्यंत बाजारात असे चढउतार सुरूच राहतील. मार्च तिमाहीतील कंपन्यांची मजबूत आर्थिक कामगिरी आणि निवडणूकपूर्व तेजीमुळे बाजाराचा वेग असाच कायम राहण्याची शक्यता बाजार विश्लेषकांनी व्यक्त केली आहे. दुसरीकडे, मुंबई शेअर बाजारातील सूचिबद्ध कंपन्यांचे बाजारभांडवल चारशे लाख कोटी रुपयांच्या विक्रमी टप्प्यावर पोहोचले. विशेष म्हणजे हे भारतीय अर्थव्यवस्थेच्या १.३३ पट आकाराच्या समतुल्य आहे. मुंबई शेअर बाजारातील सूचिबद्ध कंपन्यांच्या बाजार भांडवलात अवघ्या नऊ महिन्यांच्या कालावधीत १०० लाख कोटी रुपयांची भर पडली आहे. मुंबई शेअर बाजारातील कंपन्यांचे एकत्रित बाजार भांडवल सप्टेंबर २००७ मध्ये पहिल्यांदा ५० लाख कोटी रुपयांवर पोहोचले. त्यानंतर मार्च २०१४ मध्ये प्रथमच १०० लाख कोटी रुपयांचा टप्पा गाठला. त्यानंतर २०० लाख कोटी रुपयांचा टप्पा गाठण्यासाठी ७ वर्षे लागली. फेब्रुवारी २०२१ मध्ये तो टप्पा गाठला गेला. जुलै २०२३ मध्ये बाजार भांडवल ३०० लाख कोटी होते, तेथून पुढे अवघ्या नऊ महिन्यांमध्ये ते ४०० लाख कोटी रुपयांवर पोहोचले. या नऊ महिन्यांच्या कालावधीत सेन्सेक्स १५ टक्के वधारला. तर व्यापक बाजाराचे प्रतिनिधित्व करणारे मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांक प्रत्येकी ४० टक्क्यांनी वधारले.गेल्या महिन्यात रिझर्व्ह बँक आणि सेबीसारख्या नियामक संस्थांनी मिडकॅप आणि स्मॉलकॅप कंपन्यांच्या समभागांमधील वाढलेल्या मूल्यांकनाबाबत चिंता व्यक्त केली; मात्र हा सौम्य धक्का पचवल्यानंतर त्यांनी गेल्या आठवड्यात जोरदार पुनरावृत्ती केली. गेल्या नऊ महिन्यांच्या कालावधीत गृहनिर्माण क्षेत्र, सार्वजनिक क्षेत्रातील बँक, वाहननिर्मिती, ऊर्जा आणि औषध निर्माण या क्षेत्रातील कंपन्यांचे समभाग सर्वाधिक वधारले. भांडवली बाजाराला उच्चांकी पातळीवर पोहोचवण्यास सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांचे मोठे योगदान राहिले आहे. अनेक वर्षांपासून अडगळीत लोटल्या गेलेल्या सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांवर अचानक प्रकाशझोत आला. सेन्सेक्सच्या ६० हजारांवरून ७५ हजारांपर्यंतच्या प्रवासादरम्यान सार्वजनिक क्षेत्रातील सूचिबद्ध कंपन्यांच्या बाजार भांडवलात तब्बल दुपटीने झालेल्या वाढीची प्रमुख भूमिका राहिली आहे. सरकारी धोरणे आणि मोदी की गॅरंटी यांच्याशी संबंधित गुंतवणूकदारांचा विश्वास वाढला आहे. सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांशी संबंधित पीएसयू निर्देशांक आणि पीएसयू बँक निर्देशांक एका वर्षात जवळपास दुप्पट झाले आहेत. जागतिक पातळीवरील आव्हानात्मक वातावरणातही देशाची अर्थव्यवस्था वेगाने मार्गक्रमण करत आहे. या आशावादाने प्रेरीत होऊन परदेशी गुंतवणूकदारांनी २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये देशांतर्गत भांडवली बाजारामध्ये दोन लाख कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक केली आहे.२०२३-२४ या आर्थिक वर्षात प्रारंभिक भाग विक्री, म्हणजेच आयपीओमधून देशात ६२ हजार कोटी रुपयांची भांडवल उभारणी झाली. २०२४-२५ या वर्षात वेगवेगळ्या कंपन्या मिळून एक लाख कोटी रुपये आयपीओंमधून जमवतील, अशी शक्यता आहे. देशातील आर्थिक विकासदर सात टक्के असून उद्योगधंद्यांना भागविक्रीतून दर वर्षी अडीच लाख कोटी रुपये जमवणे आवश्यक असते. कर्ज उभारणीपेक्षा शेअर बाजारातून निधी जमवणे अधिक स्वस्त पडते. एकूण ५६ कंपन्यांनी एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडियाकडे (सेबी) ७० हजार कोटी रुपये भांडवल उभारणीसाठी कागदपत्रे सादर केली आहेत. या खेरीज १९ कंपन्यांनी २५ हजार कोटी रुपयांचे प्रस्ताव मंजूर करून घेतले आहेत. तर ३७ कंपन्या ४५ हजार कोटी रुपयांची समभाग विक्रीस काढणार आहेत. यात विशेषत्वाने सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे लगतच्या काळात येऊ घातलेले ५६ पैकी नऊ आयपीओ हे टेक कंपन्यांचे आहेत. देशातील टेक कंपन्या अधिकाधिक भांडवलसधन होणे, हे अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने चांगले असते. मागच्या वर्षीपेक्षा चालू वर्षात १९ टक्के अधिक भांडवल उभारणी होईल, असे दिसते. बाजारात आलेल्या आयपीओंपैकी ७० टक्के किंवा ५० कंपन्यांचे शेअर्स हे इश्यू प्राइसपेक्षा किंवा विक्री किमतीपेक्षा अधिक किमतीला बाजारात विकले जात आहेत. म्हणजेच त्यांचे व्यवहार मूळ किमतीपेक्षा जास्त भावाने केले जात आहेत. भारतीय उद्योजकता मोठ्या प्रमाणात चैतन्यशील होत आहे. परदेशी गुंतवणुकीला सरकारचे पूर्ण समर्थन प्राप्त आहे. ईझ ऑफ डुइंग बिझनेसवर भर दिला जात असल्यामुळे मंजुऱ्या पटापट मिळत आहेत. खासगी भांडवलाला जोम प्राप्त होणे, प्रचंड प्रमाणात रोजगारनिर्मिती होणे आणि पायाभूत सुविधांचा विस्तार हे सर्व घडून आल्यास शेअर बाजाराला फायदाच होईल.

# हनुमान जन्मोत्सवानिमित्त नालेगाव येथे कार्यक्रम



**समाचार/नगर-दि.२३**

श्री हनुमंत रायांनी समाजाला भक्तीची दिशा शिकवली आई-वडिलांची सेवा ही ईश्वर सेवा असून ती प्रत्येकाने करावी धार्मिक कार्यक्रमाच्या माध्यमातून समाज एकवटला जात असून माजी नगरसेवक दत्तात्रय मुदगल हे गेल्या ३५ वर्षापासून अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करत आहे. त्यामुळे समाजामध्ये एकोपा निर्माण होऊन विचाराची देवाणघेवाण होते, असे प्रतिपादक ह.भ.प. प्रांजल ताई जाधव यांनी केले.

नालेगाव गाडगीळ पटांगण येथे हनुमान जयंती निमित्त छत्रपती शिवाजी महाराज तरुण मंडळाच्या वतीने ह.भ.प. प्रांजल ताई जाधव यांचे कीर्तन झाले. यावेळी नालेगाव ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नालेगाव येथे श्री हनुमान जयंती निमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताह मध्ये ह.भ.प. प्रांजल ताई जाधव या वारकरी मुलीने वयाच्या अवघ्या १८ वर्षामध्ये आध्यात्मिक व धार्मिकतेचे धडे घेऊन कीर्तन रुपी सेवा केली यावेळी श्रोत्यांच्या वतीने या वारकरी मुलीचे कौतुक करत तिच्या कीर्तनाला साथ दिली.

# पुस्तके इतरांचे आयुष्य फुलवतात- डॉ. शिंदे



**समाचार/नगर-दि.२३**

सोशलमीडियाला कंटाळल्याने लोक पुस्तक वाचनाकडे वळत आहेत. वाचनासाठी खास वेळ ही काढतात. चांगल्या पुस्तकाची चिकित्सा करतात आपले मत मांडतात. शहरासह गाव खेड्यात ही वाचन संस्कृती बहरत आहे. हार, फुले, पुष्पगुच्छ कालांतराने सुकून जातात. मात्र त्या ऐवजी पुस्तके दिल्यास ती इतरांचे आयुष्य आनंदाने फुलवून टाकतात. त्यांचे विचार समृद्ध करतात, असे प्रतिपादन स्नेहबंध सोशल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी केले.

जागतिक पुस्तक दिनानिमित्त डॉ. शिंदे यांनी भिंगार छावणी परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रांत मोरे यांना पुस्तक भेट दिले. त्यावेळी ते बोलत होते. डॉ. शिंदे म्हणाले, अवांतर पुस्तक वाचनाकडे वळावे यासाठी संस्थेच्या, शासनाच्या तसेच दानशूर व्यक्तींच्या माध्यमातून गावागावांत ग्रंथालय उभारण्यात आले आहेत. यामुळे गावागावांत वाचन संस्कृती वृद्धिंगत होत आहे. ही बाब निश्चित स्वागतार्ह आहे. पुस्तके वाचली पाहिजेत. जसा वेळ मिळेल तसे वाचत राहिले पाहिजे, असे छावणी परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रांत मोरे म्हणाले.

# संत सोयराबाई



**संतगाथा**

महाराष्ट्र हि संतांची पुण्यभूमी आहे. महाराष्ट्रामध्ये अनेक जाती धर्माचे संत होऊन गेले, ज्यांनी आपल्या कार्यातून जनतेला समतेचा संदेश दिला आहे. यामध्ये अनेक स्त्री संत हि होऊन गेल्या. आपल्या अभंगातून जगण्याचे वास्तव रोखठोक पणे सांगणारे व्यक्तिमत्व म्हणजे 'संत सोयराबाई'. साक्षात विठोबाला आपल्या घरी जेवणाचे निमंत्रण देणाऱ्या संत सोयराबाई या मराठी संत कवयित्री होत्या. त्यांचे अभंग वाचले किंवा ऐकले तरी आपले जीवन धन्य झाल्याचा अनुभव येतो. मन प्रसन्न होते .भगवंत भक्ती भक्तांच्या मनात सतत ठेवण्याचे कार्य अशा संतांच्या अभंगामुळे शक्य झालं आहे. भगवंता समीप जाण्याचा अत्यंत सोपा सरळ नामस्मरणाचा मार्ग अभंगाद्वारे उपलब्ध झाला आहे.

चोखोबाची बायकोअसं अभिमानानं म्हणवून घेत असल्या तरी त्यांनी स्वत:चं वेगळेपण सिद्ध केलं आहे. सोयराबाईच्या अभंगांमधून डोकावणारं तत्त्वज्ञान सोपं आहे. त्यात जड शब्द नाहीत. भाषा साधी, सोपी आणि रसाळ आहे. अभंग आधी स्वत:साठी आणि मग जनांसाठी.. आत्मशुद्धी ते परमात्मा.. असा हा प्रवास आहे. एक स्त्री ज्ञानाची आस बाळगते. स्वत:च त्याचा शोध घेते. स्वत:ला पारखते. समाजाशी झगडते. स्वत:शी, देवाशी वाद घालते आणि त्यातून गवसलेले लख्ख कण जनांसाठी मागे ठेवत भागवत्धर्माच्या मांदियाळीत अढळ स्थान मिळवते. हे सगळंच अलौकिक आहे.

सोयराबाईंच्या अभंगात जगण्यातलं वास्तव फार रोखठोकपणे येतं.

सुखात हजार वाटेकरी असतात दु:ख तुमचं एकट्याचं असतं, हे त्यांनी फार सुंदर शब्दांत सांगितलंय

अवघे दु:खाचे सांगाती ।<br>
दु:ख होता पळती आपोआप।।<br>
आर्या पुत्र भगिनी माता आणि पिता<br>
हे अवघे सर्वथा सुखाचेचि।।

त्यांच्या अभंगांमधून नाममहात्म्यही पुन्हा पुन्हा येतं. त्यांचे बरेचसे अभंग या भोवतीच आहेत.

सुखाचे नाम आवडीने गावे<br>
वाचे आळवावे विठोबासी

हा प्रसिद्ध अभंगही सोयराबाई यांचाच आहे

सोयराबाई म्हणजे आत्मा परमात्म्याचं नातं उलगडणारी ही रांधणारी, घर-संसार सांभाळणारी गृहिणी आहे.

अपत्यासाठी आस लावून बसणारी आई आहे.

नवऱ्याची वाट पाहणारी स्त्री आहे.

साक्षात विठोबाला ती जेवायचं आमंत्रण देते.

विदुराघरच्या कण्या आणि दौपदीच्या थाळीतलं भाजीचं पान गोड मानणारा देव गावकुसाबाहेरच्या येसकराच्या घरी जेवेल याची तिला खात्री आहे. एवढा हा विश्वास सगळ्यांच्याच मनात असायला हवा आणि तो निर्माण करण्याचा सामर्थ्य संतांच्या अभंगात आहे

सोयरा- चोखोबाला बरेच दिवस मूल नव्हतं. अपत्यप्राप्तीच्या आसेनं कासावीस झालेली सोयराबाई अभंगात म्हणते.

आमच्या कुळी नाही वो संतान<br>
तेणे वाटे शीण माझ्या मना..

असं सांगताना उदास असलेली सोयराबाई कर्ममेळ्याचा जन्म झाल्यावर अत्यानंदाने हुरळून गेली आहे इतकी की ती बारशासाठी चक्क विठ्ठल रुक्मिणीलाच निमंत्रण देते.

सोयराबाईंनी बरेच अभंग लिहिले पण केवळ ९२ उपलब्ध आहेत. त्यांच्या अभंगांमध्ये ती स्वत:ला चोखोबाची महारी म्हणते. चोखोबाची बायको असे अभिमानाने म्हणवून घेत असली तरी तिने स्वत:चे वेगळेपण सिद्ध केले आहे. अत्यंत साधी, सोपी आणि रसाळ भाषा हे सोयराबाईंच्या अभंगांचे वैशिष्ट्य होय.

सोयराबाईंना असा विश्वास होता की केवळ शरीर अपवित्र किंवा प्रदूषित असू शकते परंतु आत्मा कधीही अशुद्ध नसतो. ज्ञानार्जन हे शुद्धच असते.

देहासी विटाळ म्हणती सकळ ।<br>
आत्मा तो निर्मळ शुद्ध बुद्ध ।।<br>
देहीचा विटाळ देहीच जन्मला ।<br>
सोवळा तो झाला कवण धर्म ।।

**- शारदा अनंत होशिंग**<br>
समर्थ सत्संग परिवार<br>
९४२०७४८७१८




## राशीभविष्य

- **मेष** : नव्या योजना मार्गी लागतील. कौटुंबिक स्वास्थ्य लाभेल. स्थावर प्रश्नात तडजोड करावी लागेल.
- **वृषभ** : घरगुती प्रश्नांचा गुंता वाढेल. व्यवसायात कामाचा ताण वाढेल. प्रकृतीच्या तक्रारींकडे लक्ष द्यावं.
- **मिथुन** : आर्थिक व्यवहारात लाभ होईल. दिलासादायक घटना घडतील. ज्येष्ठांचा सल्ला कामी येईल.
- **कर्क** : मनाजोग्या घटना घडतील. मुलांच्या कला-गुणांना वाव मिळेल. नव्या ओळखींचा लाभ घ्यावा.
- **सिंह** : नोकरीत जबाबदाऱ्या येतील. कामासाठी धावपळ, दगदग होईल. उष्णतेचे विकार संभवतात.
- **कन्या** : सरकारी कामं मार्गी लागतील. खर्चाचं प्रमाण वाढतं राहील. पर्यटन उद्योगात अनुकूलता राहील.
- **तूळ** : कर्ज प्रकरणात दिलासा मिळेल. अंगभूत कला-गुणांचा विकास होईल. लॉटरीतून लाभ संभवतो.
- **वृश्चिक** : विवाहाची बोलणी सफल होतील. कामासाठी प्रवास लाभदायक ठरेल. मानसिक स्वास्थ्य राहील.
- **धनु** : अनावश्यक खर्च टाळावा. गुंतवणूक तुर्तास करू नये. प्रक्रिया उद्योगात विशेष अनुकूलता लाभेल.
- **मकर** : अनपेक्षित घटनांनी दिलासा मिळेल. कलाकारांचा उत्साह वाढता राहील. बाकी चिंता नसावी.
- **कुंभ** : कौटुंबिक प्रश्नांचा ताण राहील. विवाहेच्छुकांचे विवाह ठरतील. मुलांच्या प्रगतीकडे लक्ष द्यावं.
- **मीन** : प्रियजनांच्या भेटी होतील. धार्मिक स्थळांची यात्रा घडेल. व्यवसायात बदलाचा विचार होईल.

## दिन विशेष

**२४ एप्रिल**

- **१९७३:** महान क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यांचा जन्म.
- **२०११:** सत्य साईबाबा यांचे निधन.
- **२०१६:** विजय मल्ल्या यांचा पासपोर्ट रद्द करण्यात आला.
- **२०१७:** छत्तीसगडमधील सुकमा जिल्ह्यामध्ये नक्षलवादी हल्ल्यात २५ जवान हुतात्मा, सहा जण जखमी.
- **२०१८:** गडचिरोलीतील बोरिया जंगलातील चकमकीत ठार झालेल्या नक्षलवाद्यांचा आकडा वाढला.

**आरोग्यमंत्र**

## दातांवरील शस्त्रक्रियेनंतर...

दंतविकार बळावल्यास शस्त्रक्रियेचा पर्याय निवडला जातो. मात्र दंत शस्त्रक्रियेनंतर साधारणपणे २४ तासांमध्ये हिरड्यांना सूज येण्याची शक्यता असते. ही सूज ७ ते १० दिवसांपर्यंत राहू शकते. शस्त्रक्रियेनंतरच्या वेदना टाळण्यासाठीच्या उपायांविषयी...

✻ बर्फाचे तुकडे फडक्यात बांधून सूज आलेल्या आणि दुखऱ्या भागावर ठेवा. दहा मिनिटांनी बर्फ काढा. थोड्या वेळाने पुन्हा ठेवा. यामुळे आराम मिळेल. ✻ शस्त्रक्रियेच्या ४८ तासांनंतर बर्फाऐवजी गरम पाण्याच्या पिशव्या ठेवणं सुरू करा. थंडाव्यानंतर गरम पाण्याचा शेक दिला की रक्ताभिसरण सुधारेल आणि वेदना कमी होतील. ✻ दातांवरच्या शस्त्रक्रियेनंतर चावायला कठीण अन्न खाऊ नका. द्रव पदार्थ तसंच मऊ भात, खिचडी असे पदार्थ खा. सूप, दही, उकडून कुस्करलेला बटाटा असे पदार्थही खाता येतील.



मिल्क शेक, फळांचे रस असे पर्यायही आहेत. तिखट, अति थंड, अतिगरम पदार्थ आणि सोडा टाळा. ✻ दातांची काळजी घेणं अत्यंत गरजेचं आहे. यासाठी नियमित दात घासा. खळखळून चूळ भरा. शस्त्रक्रियेनंतर हलक्या हातांनी दात घासा. ब्रशमुळे जंतूसंसर्ग होण्याची शक्यता असते. त्यामुळे चांगला ब्रश वापरा. ✻ झोपताना डोक सरळ ठेवा. ✻ शस्त्रक्रियेनंतरची सूज कमी करायची असेल तर कोमट पाण्यात थोडं मीठ घालून त्याने तोंड धुवा. दिवसातून चार वेळा असं केल्यास आराम मिळेल.

**महत्त्वपूर्ण काही**

## असेही प्राणी...

आपल्या आसपास वेगवेगळ्या प्रकारचे सजीव पहायला मिळतात. या प्रजातींमधले काही सजीव चित्र-विचित्र आहेत. त्यांचं दिसणं, असणं फारच वेगळं आहे. असे सजीव अस्तित्त्वात आहेत. अशाच काही सजिवांविषयी. ✻ स्टोव्ह पाईप स्पंज नावाचा सजीव समुद्रात आढळतो. या सजिवाचा आकार ट्यूबलाईटसारखा होतो. तसंच तो पाच फूट तीन इंचांपर्यंत उंच होऊ शकतो. हा सजीव शेकडो वर्षं जगू शकतो. ✻ ब्लॉब फिश हा समुद्रात तब्बल २४०० फूट खोल राहणारा मासा आहे. समुद्राच्या पाण्यापेक्षा कमी वजन असल्याने तो पाण्यात अगदी सहज तरंगू शकतो. ✻ थोर्नी डेव्हिल नावाची एक पाल ऑस्ट्रेलियातच आढळते. हिच्या संपूर्ण शरीरावर काटे असतात. या पालीच्या डोक्यावरचा काटा खूप मोठा असतो. ही पाल दिवसभरात हजारो मुंग्या खाऊन टाकते. ✻ दक्षिण तसंच मध्य अमेरिकेतल्या काही देशांमध्ये पोटू नावाचा पक्षी आढळतो. याच्या त्वचेचा रंग खोडाच्या लाकडासारखा असतो. मान हे या प्राण्यांचं मुख्य वैशिष्ट्य आहे.

**सल्ला मोलाचा**

## जपा त्वचेचं आरोग्य

उन्हाने दहशत निर्माण केली आहे. उन्हात फिरणं टाळावं असा कितीही सल्ला दिला तरी काही वेळा बाहेर पडण्याशिवाय गत्यंतर नसतं. अशा वेळी त्वचेची काळजी घेण्याच्या या काही टिप्स. ✻ उन्हापासून त्वचेचं रक्षण करायचं असेल तर भरपूर पाणी प्या. शरीरातला ओलावा टिकून रहायला हवा. पाण्यामुळे तुमची त्वचा अधिक आरोग्यदायी बनते. चेहऱ्यावर चमक येते. ✻ तेलकट पदार्थांमुळे पिंपल्सची समस्या निर्माण होऊ शकते. त्यामुळे तळकट आणि तुपकट पदार्थ टाळले पाहिजेत. या काळात संत्र, मोसंबीसारखी क जीवनसत्त्व असलेली फळं खाल्ली पाहिजे. यामुळे त्वचेतला ओलावा टिकून राहतो. 'क' जीवनसत्त्वामुळे त्वचेला तजेला मिळतो. ✻ सन टॅन काढून टाकण्यासाठी चेहऱ्याला अँटी टॅन मास्क लावा. ऑरेंज बेस्ड पील ऑफ मास्क हा चांगला ऑप्शन आहे. पॅकमध्ये मध घाला. मधात अँटी बॅक्टेरिअल गुणधर्म असतात.



**पंचांग**

**बुधवार, २४ एप्रिल २०२४**<br>
क्रोधीनाम संवत्सर, शके १९४६,<br>
चैत्र कृ. १, नक्षत्र : स्वाती<br>
चंद्रराशी : तूळ, सिद्धी योग<br>
सूर्योदय: ०६.१७, सूर्यास्त: ६.५७

**फॉरवर्डस**

**एखादी व्यक्ती आवडणं वेगळं आणि प्रेम करणं वेगळं...**

चाहत का क्या, किसी को भी चाह ले<br>
मसला मोहब्बत का हैं, सिर्फ एक से ही होती हैं

**स्मार्ट शॉपिंग**

सोफ्याची फ्रेम बनवताना जॉईनिंगसाठी कॉर्नर ब्लॉक्स, लाकडाचे कॉर्नर ब्लॉक्स, मेटल स्क्रू अथवा ब्रॅकेट यासारखे पर्याय निवडले जातात. या पद्धतीने तयार केलेली फ्रेम दणकट आणि टिकावू असते. मात्र खिळे ठोकून, स्टेपल्स वापरुन अथवा ग्लूचा वापर करुन बनवलेली फ्रेम अतिशय तकलादू असते. असे सोफे फार काळ टिकत नाहीत. त्यामुळे त्याची खरेदी टाळावी. सोफ्याची बॅक कशी आहे हेदेखील काळजीपूर्वक बघावं. पाठीला आराम देणारी, योग्य कुशनिंग असणारी आणि योग्य आकार असणारी बॅक असणारा सोफा सर्वोत्तम ठरतो.

**करिअरवाटा**

## जपा मौलिक वारसा

वारसा जपणं ही आपल्या देशाची संस्कृती आहे. सुदैवाने आपल्या देशाला सामाजिक, सांस्कृतिक तसंच पौराणिकतेबाबत संपन्न वारसा लाभला आहे. या देशात अनेक ग्रंथांची निर्मिती करण्यात आली. त्यातून मानवी जीवनाचं तत्त्वज्ञान तसंच सामाजिक सुधारणांबाबत प्रबोधन करण्यात आलं. आजच्या आधुनिक काळातही या ग्रंथांचं महत्त्व कमी झालेलं नाही. उलट संपूर्ण जगाला मार्गदर्शक ठरतील, इतकं या ग्रंथांचं महत्त्व प्रतित होत आहे. विशेष म्हणजे या संदर्भात अधिक संशोधनासाठी तसंच त्या त्या विषयात डॉक्टरेट मिळवण्यासाठी विद्यार्थी पुढं येत आहेत. आपल्याकडे वेद, उपनिषदं, गीता, रामायण, महाभारत, अध्यात्मिक विद्या, योग अशा अनेक विषयांचं उत्तम ज्ञान उपलब्ध आहे. या विषयांचं वैशिष्ट्य म्हणजे विज्ञान, समाजशास्त्र, भाषा, आरोग्य विज्ञान अशा अनेक विषयांच्या अनुषंगाने या विषयांवर संशोधन करता येतं. अशा सर्व भारतीय ज्ञानशाखांना 'इंडॉलॉजी' म्हणतात. भारतातील काही संस्थांनी ही जुनी संस्कृती जतन करण्याच्या उद्देशाने वैदिक वाङ्मयाचे अभ्यासक्रम सुरू केले आहेत. भारताचा संपन्न वारसा जपण्यासाठी आणि त्याच्या प्रचार-प्रसारासाठी हे अभ्यासक्रम महत्त्वाचे ठरणारे आहेत.



**खेचाखेची**

## आधी आणि आत्ता

आजकाल मुलांना उन्हाचा त्रास होत असेल तर पालक त्यांना थंड हवेच्या ठिकाणी म्हणजे महाबळेश्वर, मनाली, शिमला, नैनिताल असं फिरवून आणतात.

.

.

आमच्यावेळी आई-वडील सरळ चकोट करुन आणायचे आणि म्हणायचे...

.

.

आता गार वाटते का पोरा...?

**वेगळं काही**

हिमाचल प्रदेशमधल्या मलाणा या ठिकाणी अकबराची पूजा केली जाते. एवढंच नाही, तर इथल्या कोणत्याही वस्तूला हात लावला तर एक हजार रूपये दंड भरावा लागतो. अकबराची पूजा करणारं हे जगातलं एकमेव गाव असावं. इथे काम करणाऱ्या माणसांनाही स्पर्श केला जात नाही. दुकानातून वस्तू खरेदी करायची असेल तर दुरूनच दुकानदाराला सांगावं लागतं. इथल्या भाषेत काही ग्रीक शब्दही आहेत. म्हणूनच इथल्या परंपराही वेगळ्या आहेत. तुम्हीही कुल्लूला जाल तेव्हा या गावाला नक्की भेट द्या. लोकांशी बोला. पण एकाही वस्तूला हात लाऊ नका. नाही तर काही हजार रूपयांचा दंड भरावा लागेल...

**फॅशन पॅशन**

## जलवा बोल्ड प्रिंटचा

समर सिझनमध्ये बोल्ड प्रिंट्सचे कपडे छान दिसतात. तुम्ही बोल्ड प्रिंटची जादू अनुभवायच्या तयारीत असाल तर उपयोगी पडतील अशा काही टिप्स.

✻ संपूर्ण आउटफिटमध्ये बोल्ड प्रिंट नको. वेगवेगळ्या कॉबिनेशनमध्ये बोल्ड प्रिंट ट्राय करा. उदाहरणार्थ बोल्ड प्रिंट असणाऱ्या साडीचे काठ प्लेन असायला हवेत. उलटपक्षी काठ बोल्ड असतील तर साडी प्लेन असायला हवी. ✻ वेस्टर्न किंवा ट्रॅडिशनल अशा दोन्ही प्रकारांमध्ये बोल्ड प्रिंट खुलून दिसतं. पार्टी अटेंड करणार असाल तर बोल्ड प्रिंट गाऊन खास लूक देऊ शकतो. यामध्ये डार्क पर्पल, ब्राईट येलो, रॉयल ब्लू हे रंग इन आहेत. प्लेन ड्रेससोबत बोल्ड प्रिंटचं जॅकेट घालून तुम्ही वेगळा लूक मिळवू शकता. ✻ बोल्ड प्रिंट ट्राय करणार असाल तर फ्लोरल प्रिंटच नव्हे तर ॲनिमल प्रिंटही ट्रेंडमध्ये आहे हे लक्षात ठेवा. तरुणींमध्ये झेब्रा प्रिंटची विशेष क्रेझ आहे. आवडत असेल तर तुम्ही लाईन आणि चेक्सही ट्राय करू शकता. ✻ स्लिम असाल तर बोल्ड प्रिंटचा एक भाग असणारं फ्लॉवर प्रिंट सिलेक्ट करू शकता. याउलट वजन जास्त असेल तर आकाराने छोटे प्रिंट्स ट्राय करा.



Printed and Published by: Swati Mahendra Kulkarni, Printed at "Samachar" 4188, Maidan Aad, Ahmednagar(M Corp), Dist.Ahmednagar, Pin Code - 414 001, Maharastra, Published at 4188, Maidan Aad, Ahmednagar(M Corp), Dist Ahmednagar, Pin Code- 414 001, Maharashtra. Editor- Swati Mahendra Kulkarni, Phone - (0241) 2345270, 2347086, Mob.- 9822470074.
हे मराठी सायंदैनिक, मुद्रक, प्रकाशक स्वाती महेंद्र कुलकर्णी यांनी ''समाचार'' ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प), जिल्हा-अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे मुद्रित करून ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प) जिल्हा- अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक- स्वाती महेंद्र कुलकर्णी. दूरध्वनी- २३४५२७०, २३४७०८६, मो.- ९८२२४७००७४ E-mail - mahendra.samachar@gmail.com

## सुविचार

मनाची शक्ती ही सूर्याच्या किरणांसारखी असते जेव्हा ती एका केंद्रबिंदूवर केंद्रित होते तेव्हाच ती प्रखरतेने चमकते. **संकलित**

## सामान्यज्ञान

उत्तर अटलांटीकमध्ये जेट विमान सेवा लंडन आणि न्यूयॉर्क दरम्यान दिली गेली. कॅप्टन होता आर.ई. मिलिचाप.

**संकलन - अरविंद ब्राम्हणे**



# समाचार

मंगळवार, दि. २३ एप्रिल २०२४ पान ३


### जागतिक पुस्तक दिनानिमित्त सारडा विद्यालयात उपक्रम

# नगरमध्ये शिक्षकांची पुस्तक भिशी

**समाचार/नगर-दि.२३**

शिक्षक वाचत नाहीत, ही तक्रार अनेकदा केली जाते. पण याबाबत केवळ तक्रार न करता सीताराम सारडा विद्यालयाने वाचनाविषयी वेगळा उपक्रम राबवला. केवळ १० महिन्यात शिक्षकांनी २० ते २५ पुस्तके वाचली आहेत. त्याचप्रमाणे शिक्षकांनी पुस्तक खरेदी करण्यासाठी पुस्तक भिशी हा अनोखा उपक्रम राबवला आहे. शिक्षकांची वाचनसंस्कृती वाढवण्यासाठी केलेले हे प्रयत्न इतर शाळांना नक्कीच प्रेरणादायक व अनुकरणीय आहेत, असे प्रतिपादन मुख्याध्यापक हेरंब कुलकर्णी यांनी केले.



हिंद सेवा मंडळाच्या सीताराम सारडा विद्यालयात जुलै महिन्यात मुख्याध्यापक हेरंब कुलकर्णी यांनी शिक्षणावर आधारित असलेली अनेक प्रेरणादायक पुस्तके शाळेसाठी खरेदी केली व ती पुस्तके शिक्षकांना देवून रोज किमान २० पाने वाचावीत असे आवाहन केले. रोज शिक्षक हजेरी पत्रकावर सही करताना मुख्याध्यापकांनी काल किती पाने वाचली याचा आढावा घेवून त्याच्या नोंदी ठेवल्या. एक पुस्तक वाचल्यावर शिक्षकांनी एका स्वतंत्र वहीत प्रत्येक पुस्तकाचा परिचय लिहिला. आज सर्व शिक्षकांची २० ते २५ पुस्तके वाचून झाली आहेत व त्याचे पुस्तक परिचय ही लिहून झाले आहेत.

शिक्षकांनी वाचलेल्या पुस्तकात जास्तीत जास्त शैक्षणिक पुस्तके आहेत. तोत्तोचान, नीलची शाळा, माझी काटे मुंढरीची शाळा, दिवास्वप्न, प्रिय बाई, न पेटलेले दिवे, आमचा काय गुन्हा, विनोबा, लीलाताई पाटील यांची पुस्तके यांचा समावेश आहे.सुरुवातीला रोज वाचनाची सवय होईपर्यंत थोडा कंटाळा वाटला पण आता वाचन हा सवयीचा भाग आहे असे शिक्षक सांगतात. सुटीच्या दिवशी तर काही शिक्षकांनी १०० पाने ही वाचली आहेत. या वाचनाचा परिणाम शिक्षकांच्या दैनंदिन अध्यापनावर ही होतो आहे. खरे शिक्षण कशाला म्हणतात हे यानिमित्ताने समजले आहे. या पुस्तकातून विविध उपक्रम करण्याची प्रेरणा मिळाली असेही शिक्षकांनी सांगितले.

शिक्षकांना पुस्तक खरेदीची सवय लावावी म्हणून शाळेत पुस्तक भिशी सुरू करण्यात आली आहे. दर महिन्याला शिक्षक पैसे काढतात आणि त्यातून तीन क्रमांक काढून त्या तिघांना प्रत्येकी ३५०० रुपये दिले जातात. ते शिक्षक दुकानात जाऊन शिक्षण विषयक पुस्तके खरेदी करतात आणि सर्वांना आणून दाखवतात व वाचनप्रेमी पाहुणा निमंत्रित करून त्याच्या हस्ते ती पुस्तके दिली जातात. वाचन प्रेमी पाहुणा आवडत्या पुस्तकांविषयी बोलतात. संस्थेचे पदाधिकारी आवर्जून या पुस्तक भिशी उपक्रमाला उपस्थित राहतात. त्या सर्व पदाधिकार्यांनी या उपक्रमाचे कौतुक केले आहे. नितीन केणे व शीतल शिंदे हे शिक्षक भिशिचे नियोजन करतात.नगर शहरातील पुस्तक दुकानदार व वाचनालयाचे पदाधिकारी यांचा शहरात वाचन संस्कृती रुजवत असल्यामुळे कृतज्ञता म्हणून सन्मान करण्यात येणार आहे.

### माळीवाडा मंदिरात विशेष महापूजा; फुलांची आकर्षक सजावट

# हनुमान जन्मोत्सव सोहळा उत्साहात

**समाचार/नगर-दि.२३**

माळीवाडा येथील शनी-मारुती मंदिर येथे हनुमान जन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी ६ वा. जन्मोत्सवाच्यावेळी विशाल गणपती मंदिराचे पुजारी संगमनाथ महाराज यांच्या हस्ते अभिषेक करुन महापुजा करण्यात आली. भजनी मंडळाच्या महिलांनी पाळणा हलवून हनुमान जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी देवस्थानचे विश्वस्त पांडूरंग नन्नवरे, रंगनाथ फुलसौंदर, अशोक भंडारी, बाळासाहेब आगरकर, राज जाधव, जिवाप्पा बहिरवाडे, हर्षल म्हस्के आदिंसह भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. तसेच मंदिर परिसर फुलांसह आकर्षक सजावट करण्यात आली होती.



नगर शहरामध्ये हनुमान जयंतीनिमित्त विविध मंडळांनी आकर्षक मुर्ती उभारुन जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शहरातील विविध तालीमीमध्ये आकर्षक रोषणाई करुन युवकांनी कावडीने आणलेल्या पाण्याने अभिषेक करण्यात आले. नगर शहरातील स्टेट बँक चौक, सर्जेपुरा, दिल्लीगेट, लक्ष्मी कारंजा, माळीवाडा, नेप्तीगेट, झेंडीगेट, नेता सुभाष चौक, नालेगांव, वारुळाचा मारुती, नवग्रह मंदिर, भुतकरवाडी, श्रमिकनगर, पावन हनुमान मंदिर, बालिकाश्रम रोड, खाकीदास बाबा मठ, नित्यसेवा सोसायटी, मार्कंडेय सोसायटी गुलमोहोर रोड, तपोवन, भोसले आखाडा, अरणगांव रोड, रेल्वेस्टेशन, केडगांव, एकनाथनगर, भिंगार येथील रोकडेश्वर मंदिरावर आकर्षक सजावट करण्यात आली होती. भाविकांनी पहाटेपासूनच दर्शनासाठीसाठी रांगा लावल्या होत्या. रुईच्या पानांचा हार, मंदिराबाहेर नारळ, टरबुज-खरबुजाचा प्रसादाचे आयोजन करण्यात होते. कौठीची तालिम, नानापाटील वस्ताद, वाडिया पार्क तालिम, गणपतीची तालिम, सातपुते तालिम, झारेकरगल्ली आदिं ठिकाणीची तालमींवर रोषणाई करुन सजावट करण्यात आली होती. हनुमान जयंतीनिमित्त गेल्या ४० दिवसांपासून नगर शहरात चौका-चौकात हनुमान चालिसा पाठाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, लक्ष्मीनारायण सत्संग मंडळ, श्री रामभक्त हनुमान सत्संग मंडळ, मंगल भक्त सेवा मंडळ आदि मंडळाने शहरात व उपनगरात हनुमान चालिसाचे पठण करुन भाविकांना मंत्रमुग्ध केले.

## अंकुश नन्नवरे यांचे निधन

**समाचार/नगर-दि.२३**



कायनेटिक चौक, रविश रो-हौसिंग सोसायटी येथील रहिवासी प्रगतशिल शेतकरी अंकुश शंकरराव नन्नवरे यांचे नुकतेच वृद्धपकाळाने निधन झाले. ते ८० वर्षांचे होते. त्यांच्यावर नालेगांव, अमरधाम स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते धार्मिक व मनमिळावू स्वभावाचे होते. जि.प. मधील सामान्य प्रशासन विभागातील वरिष्ठ सहा. प्रदीप नन्नवरे व नगर तालुका वाचनालयाचे ग्रंथपाल संदिप नन्नवरे यांचे ते वडिल होत.

### गणेश कवडे; हनुमान जन्मोत्सवा निमित्त नालेगावात कार्यक्रम

# शक्ती आणि भक्तीचा मिलाप म्हणजे बजरंगबली

**समाचार/नगर-दि.२३**

शक्ती आणि भक्तीचा मिलाप म्हणजे बजरंगबली होय. प्रभु रामचंद्रांची नि:स्सीम भक्ती करुन निष्ठा कशी असावी हे भगवंत हनुमानांनी आपल्या सेवेतून दाखवून दिले आहे. हा आदर्श आपल्या जीवनात अंगीकृत करण्याची गरज आहे. हनुमान जयंतीनिमित्त महाप्रसादाच्या वाटपातून सामाजिक ऐक्य निर्माण होण्यास मदत होते. प्रसादाचे महात्म्य मोठे असल्याने भाविकांना लाभ घेऊन तुप्त होत आहे. ही तृप्तीच आपणा सर्वांना समाधान देणारी आहे, असे प्रतिपादन मनपा माजी स्थायी समिती सभापती गणेश कवडे यांनी केले.



हनुमान जयंतीनिमित्त नाना पाटील वस्ताद तालिमीच्यावतीने कावडीने आणलेल्या पवित्र पाण्याने अभिषेक करण्यात आला. याप्रसंगी गणेश कवडे, रामभाऊ नळकांडे, बापू शेळके, नितीन रोहोकले, मळू वामन, दत्ता ठागणे, अतुल वाकचौरे, बजरंग महाराज शेळके, बापू दिवेकर, राजु म्हस्के, पप्पू गुंजाळ, मन्नी शिंदे, अनिल कवडे, ओंकार कवडे, निलेश काळे, बाळू काळे, शैलेश काळे, सोहम वाव्हाळ, शाम शिंदे, शंभुराज भुतकर, अमर शिंदे आदि उपस्थित होते.

गणेश कवडे म्हणाले, हनुमान जयंतीची नालेगांवची मोठी परंपरा आहे. दरवर्षी नालेगांव येथील नाना पाटील वस्ताद तालिम येथील युवकांकडून प्रवरासंगम येथून कावडीने पाणी आणून जलाभिषेक केला जातो. युवकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री हनुमानाची उपासना करुन अनेक कुस्तीची मैदानी गाजवली आहेत. नाना पाटील वस्ताद तालिम सध्या जिर्णोद्धाराचे काम सुरु असून, लवकर ते काम पुर्णत्वास येऊन व एक आधुनिक तालिम या पहिलवांनासाठी सज्ज असेल, असे त्यांनी सांगितले.

# शिंदे, फडणवीस यांचा नामांतराबद्दल सत्कार

**समाचार/नगर-दि.२३**

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी नगरमध्ये जाहीर सभेतून अहमदनगरचे नामांतर अहिल्यानगर करण्यावर शिक्कामोर्तब केला. याबद्दल शहर भाजपा युवा मोर्च्याच्या वतीने शहर जिल्हाध्यक्ष मयूर बोचूघोळ व उपाध्यक्ष सोमनाथ जाधव यांनी मुख्यमंत्री शिंदे व उपमुख्यमंत्री फडणवीस यांना श्रीरामाची मूर्ती देवून सत्कार करून आभार मानले. चौपाटी कारंजा येथे झालेल्या सभेत हा सत्कार करण्यात आला.

याबद्दल प्रतिक्रिया देताना मयूर बोचूघोळ म्हणाले, भाजपाच्या सरकारने अहमदनगरचे नामांतर अहिल्यानगर करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय काही महिन्यापूर्वी घेतला आहे. याचा आनंद सर्व नगर वासियांना आहे. लोकसभा निवडणुकीचे भाजपचे उमेदवार खा.डॉ.सुजय विखे यांच्या प्रचाराच्या शुभारंभासाठी चौपाटी कारंजा येथे झलेल्या जाहीर सभेत अहिल्यानगरच्या नामांतरावर राज्याचे मुख्यमंत्री शिंदे व उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी पुन्हा एकदा शिक्कामोर्तब केला आहे. याबद्दल त्यांचे आभार मनात श्रीरामाची मूर्ती देत त्यांचा सत्कार करून आभार मानले. ही ऐतिहासिक घोषणा चौपाटी कारंजा परिसरात झाल्याचा अभिमान आम्हाला आहे.




**समाचार**

**वाचकांना नम्र सूचना**

**समाचार** वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची **समाचार** वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दल **समाचार** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.



**पान १ वरुन**


## दहा जागा लढवणारे देशाचे भवितव्य कसे घडवणार

वर्षे घरात बसून होते. त्यावेळी नगर जिल्ह्यासाठी कोणतीही मदत महाविकास आघाडीचे नेते करु शकले नाहीत. पिंपळगाव जोगा धरणाचा प्रश्न प्राधान्याने सोडविण्याची आपली भूमिका आहे. पारनेर तालुका आता बागायती कसा होईल, यासाठी प्रयत्न करणार आहोत. नगर जिल्ह्यातील तरुणांना जिल्ह्यातच रोजगार निर्माण करुन देण्यासाठी अनेक उद्योग नव्याने आणण्याची आपली भूमिका आहे. इतरांसारखी उद्योजकांना धाक, दडपशाहीने पळवून लावण्याची भूमिका आमची नसल्याचा टोला त्यांनी लगावला. विखे पुढे म्हणाले की, मागील दहा वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाचा विकास सर्व क्षेत्रांमध्ये होत आहे. मोदींची गॅरंटी आता देशवासियांना मिळाली आहे. त्यामुळेच त्यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी देशातील नागरिक सज्ज झाले आहेत. ही निवडणूक देशाचे भवितव्य घडविणारी आहे. करोना संकटात पंतप्रधान नरेंद्र मोदी देशवासियांच्या पाठीशी उभे राहीले. मोफत धान्य योजनेपासून ते आयुष्यमान भारत योजनेपर्यंत, सामाजिक योजनांना त्यांनी प्राधान्य दिले. जिल्ह्यात किसान सन्मान योजनेच्या माध्यमातून पारनेर तालुक्यात ४४ हजार ३८० शेतकऱ्यांना ६७ कोटी ७१ लाख रुपयांचे अनुदान आले. राज्य सरकारने सुरु केलेल्या एक रुपयात पीक विमा योजनेचा लाभ १ लाख २७ हजार शेतकऱ्यांना झाला आहे, असेही ते म्हणाले.

## गावठी कट्टा बाळगणारा जेरबंद

उद्देशाने बेलवंडी फाटा येथे थांबलेला आहे. पथकाने तेथे त्याचा शोध घेवून त्यास ताब्यात घेतले त्याने त्याचे नाव विकास रमेश पठारे असे असल्याचे सांगितले.

## हनुमान जन्मोत्सव उत्साहात

करण्यात आली होती. स्पीकरवर हनुमान चालीसा पाठ व भक्तिगीते लावण्यात आली.

## जेऊरमध्ये सहाशे किलो गोमांस पकडले

छत्रपती संभाजीनगरकडे गोमांस व गोवंशीय जनावरे कत्तल करण्यासाठी घेवुन जाणार आहे, अशी माहिती पथकाला मिळाली. पथकाने सापळा रचुन सलमान अजीज शेख (वय २८ रा. घासगल्ली, कोठला मैदान), आवाईज सलाम कुरेशी (वय २०, रा. कुरेशी मोहल्ला, जेऊर, ता. नगर) यांना ताब्यात घेतले. या कारवाईत १ लाख ८० हजार रुपये किंमतीचे ६०० किलो वजनाचे गोमांस, १ लाख २० हजार रुपये किंमतीची ६ मोठी जनावरे आणि ५ लाखाचा १ पिकअप व ४ लाखाची १ स्विफ्टकार असा एकुण १२ लाखाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. याप्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास एमआयडीसी पोलीस स्टेशन करीत आहेत.

## निवडणुकीचा पारा चढला....!

कलाकारांच्या तालावर ठेका धरत तरुणाईला वेड लावले. तिथे निलेश लंके यांनी छत्रपती संभाजी महाराज महानाट्याच्या माध्यमातून लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्वांना भावनिक साद घातली आहे. प्रभावी प्रचार यंत्रणा स्व. बाळासाहेब विखेंपासूनचे गावोगावचे नेटवर्क आणि महत्वाचे म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदींचे कार्य ही डॉ. सुजय विखेंसाठी बलस्थाने आहेत. तर मूळचा कार्यकर्त्याचा पिंड असल्याने नागरिकांशी थेट संपर्क ठेवत सर्वसमावेशक राजकारण, कार्यकर्त्यांचे जाळे आणि साधी रहाणी ही लंके यांची बलस्थाने आहेत. नगर शहरावर तसे फार पूर्वीपासून भाजपाचे प्राबल्य आहे. मूळ भाजपाची स्वतः ची अशी विशिष्ट प्रचार पध्दती आहे. प्रभाग बैठक, बुथ बैठक हा त्याचाच भाग. त्यामुळे यावेळी विखे यांना भाजपाच्या मूळ यंत्रणेशी जुळवून घ्यावे लागणार आहे. आमदार संग्राम जगताप यांची साथ विखेंसाठी शहरातून जमेची बाजू आहे. तर दुसरीकडे दिवंगत माजी आमदार अनिल राठोड यांना मानणारा आजही शहरात मोठा वर्ग आहे. हा वर्ग लंकेंच्या पाठीशी भक्कम उभा राहील तर ज्येष्ठ नेते दादाभाऊ कळमकर, माजी महापौर अभिषेक कळमकर, कॉंग्रेसचे धडाडीचे कार्यकर्ते किरण काळे, जयंत वाघ यांची शहरातून लंकेंना नक्कीच मदत मिळेल. शहरातून विखे यांना वातावरण अनुकूल दिसत असले तरी ग्रामीण भागातून लंके यांनी मोठे आव्हान उभे केल्याचे चित्र आहे. एकंदर परिस्थिती पाहता ही लढत तुल्यबळ होईल. असे चित्र आजतरी पहायला मिळत आहे. प्रत्यक्ष मतदानाला अजून जवळपास वीस दिवस शिल्लक आहेत. अजून अनेक घडामोडी घडायच्या आहेत. परंतु निवडणुकीचा ज्वर वाढून त्याचा पारा आता चढू लागला आहे, यात शंका नाही.




**हनुमान चालिसा**

**मंगल भक्त सेवा मंडळ**

**मंगळवार, दि. २३ एप्रिल २०२४**
**रात्रौ ८.३०**
**- स्थळ -**
**मंगल भक्त सेवा मंडळ**
मंगल दत्तक्षेत्र, एफ-७०, एम.आय.डी.सी., अ.नगर

**श्री श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडल**

**मंगळवार, दि. २३ एप्रिल २०२४**
**रात्रौ ८.३०**
**- स्थळ -**
**श्री हनुमान जन्मोत्सव**
**चेन्नूर परिवार**
तांगेगल्ली, जुने कोर्ट मागे

**श्री दक्षिण मुखी हनुमान सत्संग मंडळ**

**मंगळवार, दि. २३ एप्रिल २०२४**
**रात्रौ ८.३०**
**- स्थळ -**
**शनि मारुती मंदिर**
माळीवाडा वेस, सर्व सेवेकरी वृंद- विशाल गणपती मंदिर ट्रस्ट, अ.नगर


## मुंबई शेअर भाव

**रिलायन्स इंडस्ट्रीजची सर्वोत्कृष्ट आकडेवारी**
**प्रथमच नफा १ लाख करोडवर**

(शेअर सबब्रोकर)
अशोक पटवा
फोन-२४५२५२७, २४५२२६४
मोबा. ८७८८६९९९६१

**दिनांक २३-४-२०२४**
**दुपारी २ पर्यंतचे भाव**

| | |
|---|---|
| आजचा इंडेक्स : | ७३८४० |
| एसीसी | २४५६-५७ |
| एशियन पेंट | २८६२-६३ |
| बजाज ऑटो लि. | ८८२२-२३ |
| बलराम फूड चिनी | ३७९-८० |
| भारत फोर्ज | १२०९-१० |
| क्रॉम्प्टन | ३०९-१० |
| डीएलएफ | ८८७-८८ |
| डॉ. रेड्डीज् लॅब | ५९९५-९६ |
| ग्रॅफाईट इंडिया | ६८१-८२ |
| हिंदुस्थान युनिलिव्हर | २२७०-७१ |
| आयटीसी लि. | ४३०-३१ |
| एल ॲण्ड टी लि. | ३५९९-३६०० |
| रिलायन्स इंड. | २९३७-३८ |
| एसबीआय | ७७४-७५ |
| टाटा मोटर्स | ९८६-८७ |
| टाटा स्टील | १६२-६३ |
| टीसीएस | ३८७८-७९ |
| लक्ष्मी ऑरगॅनिक | २५०-५१ |
| सुवेन फार्मा | ६३८-३९ |

### हिवरे बाजारमध्ये रामकथा ज्ञानयज्ञ सोहळा

# ‘आचरणशीलता वारकरी संप्रदायाचा पाया’

**समाचार/नगर-दि.२३**

आचरणशीलता हा वारकरी संप्रदायाचा पाया आहे. हिवरे बाजारातून ग्रामराज्यातून रामराज्य ही संकल्पना पुढे येते आहे हे प्रशंसनीय आहे, असे प्रतिपादन पंढरपूर येथील संत तनपुरे बाबा चारो धाम मंडप ट्रस्टचे प्रमुख आणि पाथर्डी तालुक्यातील दगडवाडी येथील तनपुरे आश्रमाचे महंत हरिभक्त परायण बद्रीनाथ महाराज तनपुरे यांनी केले.




नगर तालुक्यातील आदर्श गाव हिवरे बाजार येथे प्रभू श्रीरामाच्या अयोध्येतील रामलला मूर्ती स्थापनेप्रसंगी पद्मश्री पोपटराव पवार यांना सस्नेह भेट मिळालेला शिलांश येथील श्रीराम मंदिरात प्रतिष्ठापित होतो आहे. त्यानिमित्त हरिभक्त पारायण समाधान महाराज शर्मा यांच्या रसाळ वाणीतून श्री राम कथा ज्ञान यज्ञ सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्याच्या सहाव्या दिवशी प्रमुख उपस्थिती बद्रीनाथ महाराज तनपुरे यांची होती. कथेच्या पाचव्या दिवशी हिवरेबाजार येथे अवकाळी पावसाने आणि वादळाने मोठे नुकसान केले त्यामुळे या दिवशी कथा होऊ शकली नाही. समाधान महाराज शर्मा यांनी कथेच्या सहाव्या दिवशी भरत भेट आणि शबरी हनुमान भेट आख्यान सादर केले.

कथा श्रवणासाठी उद्धव महाराज मंडलिक, उषा पाटील, धर्मादाय उपा आयुक्त, नगर, दत्तात्रय ठुबे, उप अभियंता, जलसंधारण, रविकांत गौतमी, उपसंचालक, आदर्श गाव योजना, शंकरराव ठुबे, अभियंता महावितरण, सिद्धार्थ क्षीरसागर, तालुका कृषी अधिकारी, रामदास दरेकर, उपविभागीय कृषी अधिकारी, श्रीगोंदा, सुरेशचंद्र घारघटे, संपादक, आदर्श गाव योजना मासिक, लोक आवाजचे संपादक विठ्ठल लांडगे, वृत्त छायाचित्रकार दत्ता इंगळे, राजेंद्र चौधरी, प्रवीण शिंगवी,अ‍ॅड. राजेंद्र बलदोटा आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

# पठाण यांच्या निधनाने शिक्षण विभाग पोरका- आमदार कानडे

**समाचार/नगर-दि.२३**

अहमदनगर जिल्हा परिषदेचे ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा श्रीरामपूर नगरपालिका शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी, शिक्षक बँकेचे माजी संचालक रमजान पठाण एक अभ्यासू व्यक्तिमत्व होते. मुख्याधिकाऱ्यांपासून चतुर्थ श्रेणी कामगारापर्यंत सर्व त्यांचे मित्र होते. त्यांनी आपल्या स्वभावाने फक्त मित्र जोडले. जिल्हा परिषदेमध्ये आम्ही एकत्र काम केले. त्यांच्या अचानक जाण्यामुळे शिक्षण विभागामध्ये मोठी दरी निर्माण झाली आहे, असे प्रतिपादन श्रीरामपूर तालुक्याचे आमदार लहू कानडे यांनी केले.



ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा प्रशासन अधिकारी रमजान पठाण यांचे अल्पशा आजाराने शनिवारी रात्री निधन झाले.

कब्रस्तानात झालेल्या श्रद्धांजली सभेत आमदार कानडे, माजी आमदार भाऊसाहेब कांबळे,जिल्हा काँग्रेसचे कार्याध्यक्ष सचिन गुजर, माजी जिल्हा परिषद सदस्य शरद नवले, माजी उपनगराध्यक्ष करण ससाणे, पंचायत समितीचे माजी उपसभापती बाळासाहेब तोरणे, शिक्षक नेते बापूसाहेब तांबे, संजय शेळके, शिक्षक बँकेचे अध्यक्ष रामेश्वर चोपडे, नगरसेवक अंजुमभाई शेख, रवींद्र गुलाटी, शिक्षक बँकेचे माजी संचालक नानासाहेब बडाख, मार्केट कमिटीचे संचालक दशरथ पिसे,राष्ट्रवादी काँग्रेसचे लकी सेठी,शिक्षण विस्तार अधिकारी ज्ञानेश्वर वाकचौरे, शिक्षक नेते विजय काटकर, पेन्शनर संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रताप देवरे,शिक्षण मंडळाचे माजी प्रशासन अधिकारी ज्ञानेश्वर पटारे, लिपिक किशोर त्रिभुवन यांचे सह अनेक मान्यवरांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

# महिलांच्या अस्तित्वासाठी निवडणूक रिंगणात- भुजबळ

**समाचार/नगर-दि.२३**

सप्टेंबर २०२३ मध्ये दिल्ली येथील संसदीय अधिवेशनात लोकसभा व राज्यसभेत महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर असतानाही दक्षिण लोकसभेला एकाही राजकीय पक्षाने महिलांना उमेदवारी दिलेली नसल्याने महिला आरक्षणाला एकप्रकारे सर्वच राजकीय पक्षांनी तिलांजली दिली आहे. असे निदर्शनास येत आहे त्यामुळे महिलांच्या अस्तित्वासाठी व महिला आरक्षणाच्या अस्मितेसाठी



आपण लोकसभा उमेदवारी अर्ज घेतला असून २५ तारखेला अर्ज सादर करणार असल्याचे काँग्रेसच्या राष्ट्रीय ओबीसी समन्वयक मंगल भुजबळ यांनी म्हटले आहे.

जातीनिहाय जनगणना केंद्र सरकारने करावी व सर्व जातीधर्मांना न्याय मिळवून द्यावा तसेच शेतकऱ्यांचे विविध प्रश्न सोडवून शेतकऱ्यांना न्याय मिळावा व इतरही प्रमुख प्रश्न घेऊन आपण ही निवडणूक लढविण्याचे ठरविले असून आपला लढा हा फक्त आणि फक्त जनतेच्या हितासाठी असल्याने व आपण सातत्याने निवडणूक असो अथवा नसो जनतेच्या संपर्कात असल्याने ही निवडणूक लढविण्यासाठी आपण रिंगणात उतरणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

### परदेशात यशस्वी झालेल्या नगरच्या पहिल्या महिला

# लंडन मॅरेथॉनमध्ये प्राची पवार यांनी फडकविला तिरंगा

**समाचार/नगर-दि.२३**

जगभर प्रतिष्ठेची समजली जाणारी टीसीएस लंडन मॅरेथॉन वयाच्या ४६ व्या वर्षी पूर्ण करुन अहमदनगर जिल्ह्यातील प्राची संग्राम पवार यांनी ब्रिटनच्या भूमीवर तिरंगा फडकविला.

नुकत्याच टीसीएस लंडन मॅरेथॉनमध्ये यावर्षी प्राची पवार भारताचे प्रतिनिधीत्व करत सहभागी झाल्या होत्या. त्यांनी ४ तास ५८ मिनिटात तब्बल ४२.१९ कि.मी. अंतर धावून शर्यत पूर्ण करणाऱ्या त्या नगरमधील पहिल्या महिला ठरल्या आहेत. त्यांना एस.पी.जे. स्पोर्टस् क्लबचे संदिप जोशी यांचे मार्गदर्शन लाभले आहे. एक उद्योजिका, आई व गृहिणी अशा वेगवेगळ्या भूमिका पार पाडताना ४६ वर्षीय प्राची पवार यांची ही नेत्रदीपक कामगिरी, सर्वच नगरकरांसाठी नक्कीच प्रेरणादायी ठरणार आहे.

यापुर्वीही प्राची संग्राम पवार यांनी २०२३ मध्ये गोवा आयर्न मॅन ७०.३ ही स्पर्धा पूर्ण केली आहे. यामध्ये अहमदनगर मधील त्या पहिल्या महिला होत्या.

त्याचबरोबर २०२३ मध्ये टाटा मुंबई मॅरेथॉन तसेच २०२४ सालची स्पर्धा ही त्यांनी पूर्ण केलेली आहे. विशेष म्हणजे अहमदनगरचा भुईकोट किल्ला ते गुजरात स्टॅच्यू ऑफ युनिटी असे ५५० किलोमीटर अंतर त्यांनी तीन दिवसात सायकलवर पूर्ण केले आहे. असे नवनवीन विक्रम त्यांच्या नावावर आहे.




## हॅलो डॉक्टर

# मोतीबिंदू कारण, लक्षण आणि उपचार




**मानवाला नाक, कान, त्वचा, जीभ आणि डोळे ही पाच इंद्रिय लाभलेली आहेत अर्थात ही इंद्रिय म्हणजे निसर्गाने मानवाला दिलेले वरदानच आहे. यापैकी दृष्टी अर्थात डोळे हे इंद्रिय इतर चारही इंद्रियांपेक्षा अत्यंत महत्वाचं इंद्रिय मानले गेलेले आहे. कारण अर्थातच संपूर्ण सृष्टी पाहण्याची किमया आपले हे इवलुसे आणि नाजूक डोळेच करतात. जन्मापासून ठराविक वयापर्यंत म्हणजेच साधारण पंचवीस तिशी पर्यंत आपली दृष्टी ही सुस्पष्ट असते. मात्र चाळीशी नंतर मात्र अनेक कारणामुळे आपल्याला दृष्टिदोष जाणवू लागतो. अनेकांना त्यामुळेच स्पष्ट दिसण्यासाठी चष्मा देखील लागतो. मात्र, जेव्हा डोळ्यांच्या अंतर्गत भागात जेंव्हा दोष निर्माण होतो आणि हा मोतीबिंदूचा दोष असतो तेव्हा मात्र परिस्थिती हि गंभीर असते. म्हणूनच, मोतीबिंदूकडे दुर्लक्ष करणे चुकीचे आणि अपायकारक असते. मुळात मोतीबिंदू म्हणजे काय? मोतीबिंदू होण्याची कारण काय असतात? मोतीबिंदूची लक्षण काय? आणि उपचार काय असतात? या संदर्भात सविस्तर जाणून घेण्यासाठी नेत्रशल्यविशारद डॉ. राजीव मेहता यांच्याशी साधलेला संवाद.**

**डोळ्यांचा मोतीबिंदू म्हणजे नेमका काय आजार आहे? मोतीबिंदूचे प्रकार किती आहेत?**

मोतीबिंदू म्हणजे डोळ्यातील नैसर्गिक भिंग नेत्रमणी धुरकट होणे होय. सर्वसाधारणपणे आपल्या डोळ्यात प्रकाशकिरण पारदर्शक भिंगाद्वारे मागील पडद्यावर केंद्रित होतात. उत्तम दृष्टीकरिता आपले हे नैसर्गिक भिंग (लेन्स) पूर्णतः पारदर्शक असणे आवश्यक असते. जेव्हा या लेन्सची पारदर्शकता मोतीबिंदूमुळे कमी होते तेव्हा रुग्णास अंधुक दिसू लागते. मोतीबिंदू म्हणजेच लेन्सला आलेला गढूळपणा. वाढत्या वयोमानासनुसार हा लेन्सचा गढूळपणा वाढत जातो आणि आपल्याला अगदीच अस्पष्ट दिसू लागते. नेत्रमणी हा बहुतांशी प्रथिने आणि नुक्लिक आम्ल या जैविक रसायनापासून बनलेला असतो. यात काही कारणांनी बदल झाल्यास नेत्रमण्यांची पारदर्शकता कमी होत जाते ज्यामुळे दृष्टी कमी होते. कोर्टीकल, अंतर्मुख, विभक्त, पोस्टरीअर, रोझोत आणि आघातजन्य असे मोतीबिंदूचे प्रकार आहेत.

**मोतीबिंदूची लक्षण सर्वसाधारणपणे काय असतात?**

डोळ्यांच्या मोतीबिंदूची अनेक लक्षण आहेत. ढगाळ किंवा अस्पष्ट दिसणे हे महत्वाचे लक्षण आहे. याशिवाय रात्रीचे कमी दिसणे विशेषतः रात्रीच्या वेळी हेडलाईट्स पाहताना दिव्याभोवती प्रभामंडळ दिसणे, चष्म्याचा नंबर वारंवार बदलणे, प्रभावित डोळ्यातील काही प्रकरणामध्ये दुहेरी दृष्टी, वाचनास अडथळा येणे अशा प्रकार मोतीबिंदूची लक्षण दिसतात.

**डोळ्यांचा मोतीबिंदू कशामुळे होतो?**

डोळ्यांचा मोतीबिंदू होण्यामागे अनेक कारण असू शकतात. यामध्ये सर्वात प्रमुख कारण म्हणजे माणसाचे वय. वयोमानानुसार दृष्टिदोष निर्माण होऊन मोतीबिंदू होऊ शकतो. याशिवाय डोळ्यांवर काही वर्षांपूर्वी झालेली शस्त्रक्रिया किंवा उपचार न केलेली एखादी इजा. उच्च रक्तदाब, डोळ्यावर अतिनील किरणांचा सातत्याने झालेला मारा, सूर्यप्रकाशाशी दीर्घ काळ आलेला संपर्क, विशिष्ट औषधांचा अतिवापर, हार्मोन्स रिप्लेसमेंट थेरेपी अशा विविध कारणामुळे मोतीबिंदू होऊ शकतो. अतिधूम्रपान, लठपणा, मधुमेह यामुळे देखील मोतीबिंदू होतो.

**मोतीबिंदूवर वैद्यकीय उपचार काय आहेत?**

मुळात मोतीबिंदू म्हणजे डोळ्यांना अस्पष्ट दिसणे होय. त्यामुळे काँटॅक्त लेन्स किंवा चष्म्याचा नंबर बदलून मोतीबिंदूच्या सुरवातीच्या अवस्थेत व्यक्तीला हे उपचार दिसण्यास मदत करू शकतात. कामावर आणि घरी लेन्स वापरता येऊ शकतात. वाचन आणि इतर दैनंदिन क्रियाकल्पासाठी भिंग वापरण्याचा प्रयत्न देखील करता येतो. जर आपल्या दैनंदिन कामात खूपच दृष्टिदोष वाढत असेल तर नेत्रतज्ज्ञांना विचारून डोळ्याच्या मोतीबिंदूची शस्त्रक्रिया करून घेता येते. या शस्त्रक्रियेनंतर कृत्रिम आयओएल क्लाऊड लेन्स बदलता येतात.

# फिलिप्सचे पुण्यात नवीन संशोधन आणि विकास केंद्र

## आरोग्यनीती

रॉयल फिलिप्स, जी आरोग्य तंत्रज्ञान क्षेत्रातील जगातील सुप्रसिद्ध (लीडिंग) कंपनी आहे, तिने पुणे, महाराष्ट्र येथे हेल्थकेअर इनोव्हेशन सेंटर (HIC) च्या विस्तारासाठी एका नवीन संशोधन आणि विकास (R&D) केंद्राचा भूमीपूजन समारंभ केला, ज्यामुळे जगभरात आरोग्यनिगा नवकल्पकतेचे भारतामध्ये वाढते महत्त्व स्पष्ट केले जात आहे. MIDC, चिंचवड येथे १० एकर जागेत वसलेल्या, आगामी सुविधेमध्ये पहिल्या टप्प्यात अंदाजे ३००,००० चौरस फूट कार्यालयाची जागा असेल आणि त्यात १९०० कर्मचारी असतील.

नवीन केंद्र, दोन वर्षांत कार्यान्वित होईल, ज्यामध्ये कंपनीच्या इमेज गाईडेड थेरपी, प्रिसीजन डायग्नोसिस, मॉनिटरींग तसेच स्लीप अँड रेस्पिरेटरी बिझनेसमधील (R&D) टीमला सहभागी करून घेतले जाईल. सर्व टीमला एका केंद्रात एकत्रित करून, फिलिप्स आवाका, वेग आणि कार्यक्षमतेसाठी अनुकूलता निर्माण करेल आणि संसाधने आणि व्यवसायांमध्ये सर्वोत्कृष्ट कार्य करण्यावर भर देईल. नाविण्यपूर्ण आरोग्य तंत्रज्ञानावर काम करत, नवीन केंद्र २०३० पर्यंत दरवर्षी २.५ अब्ज लोकांचे जीवन सुधारण्यासाठी फिलिप्सच्या जागतिक मिशनमध्ये योगदान देईल. शाश्वततेची हमी देण्यासाठी, नवीन केंद्रामध्ये ग्रीन पॉवर असेल, ईव्ही चार्जिंगच्या तरतुदी असतील आणि सायकल चालवण्याला प्रोत्साहन दिले जाईल. फिलिप्सच्या जागतिक स्तरावरील कार्यामध्ये हे एक महत्त्वाचे पाऊल असण्यासोबतच, या केंद्राच्या सुरूवातीमुळे निगा उपलब्ध व्हावी याकरिता विस्तार करण्याच्या दिशेने तंत्रज्ञानाला प्राधान्य असलेले दृष्टीकोन घेण्याची फिलिप्सची वचनबद्धता देखील मजबूत होते.

# लीलावती हॉस्पिटलचा मोफत ‘‘रोशनी मोतीबिंदू सेवा’’ हा उपक्रम




लीलावती हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, मुंबईतील चॅरिटेबल हॉस्पिटलच्या वतीने वंचित व्यक्तींसाठी मोफत नेत्र तपासणी आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्याच्या उद्देशाने रोशनी मोतीबिंदू सेवा हा उपक्रम सुरू केला आहे. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन लीलावती हॉस्पिटलचे राजीव मेहता आणि रूग्णालयाचे सीईओ नीरज उत्तमानी आणि नेत्ररोग विभागातील डॉक्टरांचे पथकाने केले. या उपक्रमाचा उद्देश डोळ्यांच्या आरोग्याविषयी जागरूकता वाढवताना गरजूंना १००% अत्याधुनिक नेत्र सेवा प्रदान करणे हा आहे.

मुंबईच्या लीलावती हॉस्पिटलमधील संस्थापक आणि विश्वस्त श्रीमती चारू मेहता यांच्या रोशनी मोतीबिंदू सेवा उपक्रमाचा एक भाग म्हणून, गरजू व्यक्तींवर कोणताही आर्थिक भार येऊ न देता अत्यावश्यक नेत्रसेवा सेवा उपलब्ध होतील. एखादी व्यक्ती याकरिता पूर्वनोंदणी करू शकते आणि तज्ज्ञांच्या देखरेखीखाली तपासणी करू शकते. हा उपक्रम केवळ वैद्यकीय

## जनआरोग्य

मदतच देत नाही तर डोळ्यांचे आरोग्य चांगले राखण्याच्या महत्त्वाबद्दल जागरूकता वाढवतो. या कार्यक्रमाद्वारे लीलावती हॉस्पिटलतर्फे आर्थिक अडचणींमुळे परवडत नसलेल्यांनाही दर्जेदार आरोग्य सेवा पुरविल्या जातील. रोशनी मोतीबिंदू सेवा उपक्रमाच्या माध्यमातून गरजू व्यक्तींना आवश्यक नेत्रसेवाचिकित्सा व उपचार उपलब्ध होतील. आर्थिकदृष्टया कमकुवत समाजातील गरजू व्यक्तींची मोफत नेत्रतपासणी आणि मोतीबिंदू

## लोकारोग्य

संकलन-संयोजन
सुबोध रणशेवरे
subodh.ranshevre rediffmail.com

## शब्दखेळ - १५५

खाली दिलेल्या चौकोनात उपवासा करिता लागणाऱ्या १० पदार्थांची नाव लपलेली आहेत. शोधा पाहू.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सा | शें | पा | व | रा | ज | गि | रा |
| बु | ग | ग | व | न | न | रं | ब |
| दा | दा | णे | री | व | मे | ग | टा |
| णा | णा | शो | शी | रा | को | प | टा |
| मी | द | ही | य | त्री | थिं | च | न |
| ज | र | व | जा | ग | बी | मी | ख |
| य | ता | ट | पू | र्णी | दू | दे | जू |
| अं | ळे | भ | ग | र | ध | श | र |

### शब्दखेळ - १५५ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| न | च | क्षु | मु | खी | अ | क्ष | सं |
| य | झा | ळ | गा | व | दृ | प | भा |
| न | क | टा | क्ष | या | ष्टी | र | लो |
| त | ज | ल | गी | र | के | भ | च |
| ने | ड | र | ता | पु | अं | णी | न |
| त्र | ती | णा | आ | ग | ल | पु | ती |
| गि | क | ला | वा | चौ | क्ष | र | सु |
| रा | म | हा | ळू | य | क | री | र्य |

PDF Compressor Free Version



### ५५० मुला-मुलींचा शिबिरात सहभाग

# आनंद बालसंस्कार शिबिरास प्रतिसाद

**समाचार/नगर-दि.२३**

मुलांवर योग्य वयात चांगले संस्कार केल्यास त्यांचा सर्वांगिण विकास होवून ते भविष्यात आदर्श बनू शकतात. राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या आशिर्वादाने आणि प्रबुध्द विचारक पूज्य आदर्शऋषीजी महाराज यांच्या प्रेरणेने अशीच आदर्श, सुसंस्कारीत पिढी घडविण्यासाठी धार्मिक परीक्षा बोर्ड अंतर्गत जैन सोशल फेडरेशनच्यावतीने आनंदधाम येथे आनंद बाल संस्कार शिबिर घेण्यात येत आहे. यावर्षी सायंकाळी ५ ते ८ या कालावधीत शिबिर झाले. जवळपास ५५० विद्यार्थी यात सहभागी झाले होते. ४० वर्षांपासून शिबिराचा उपक्रम चालू आहे.

संस्कार शिबिरावेळी आनंदधामचे पवित्र प्रांगण मुलामुलींच्या किलबिलाटाने गजबजून गेल्याचे पहायला मिळाले. शिबिरात जैन





साधू साध्वींच्या सान्निध्यात मुलांवर धार्मिक संस्कार करण्यात आले तसेच जैन धर्माचे मर्म मुलांना अतिशय साध्यासोप्या भाषेत शिकवण्यात आले. सामूहिक प्रार्थनेने शिबिराचे सत्र सुरु सुरु झाल्यावर योगा, ध्यानधारणा, धार्मिक अभ्यास यानंतर विश्रांती घेण्यात आली. याकाळात विद्यार्थ्यांना एकत्रित अल्पोपहार दिला गेला.

यानंतर मुलांना ब्रेन जिम एक्सरसाईज शिकवली गेली. मुलांच्या शारीरिक व बौद्धिक विकासाला चालना देण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले.

पूज्य आदर्शऋषीजी महाराज यांनी दररोज या मुलांशी प्रेमळ हितगुज साधत मार्गदर्शन केले. खाऊ वाटप आणि महाराष्ट्र प्रवर्तक पूज्य कुंदनऋषीजी म.सा.यांच्या मंगलपाठाने रोजच्या शिबिराची सांगता होत होती.

शिबिर सांगतेप्रसंगी मर्चंटस् बँकेचे संचालक आनंदराम मुनोत यांच्या हस्ते मुलांना खाऊ वाटप करण्यात आले. शिबिरात प्रणव गांधी योगाभ्यास करून घेतला. शिबिरासाठी सरोज कटारिया, सपना कटारिया, सीमा मुनोत, निता बोरा, बबिता गांधी, तनुजा भंडारी, सुवर्णा मुनोत, नूतन गांधी, प्रतिभा गांधी, रेश्मा कोठारी, अपेक्षा संकलेचा, शोभा गांधी, सारिका गुगळे, संतोष गांधी तसेच युवती सिमरन मुनोत, महक डुंगरवाल, दिया मुनोत, ईश्वरी चंगेडे, दिव्या कोठारी, रेश्मा चंगेडे, पायल पोखरणा, सिया मुनोत, प्रेरणा गुगळे, सुरभि गुंदेचा, मान्सी गुगळे, प्रांजल छाजेड, करून बागरेचा, भाविका गुगळे, सिध्दी भंडारी, पलक गुंदेचा, श्रावणी चंगेडिया, सिध्दी गुंदेचा आदींनी परिश्रम घेतले.

### केडगाव जैन स्थानकाच्या

# सुशोभीकरणासाठी सहकार्य करू- कोतकर

**समाचार/नगर-दि.२३**

केडगाव मध्ये मोठ्या संख्यने जैन समाजाचे वास्तव्य आहे. येथील जैन स्थानाकाच्या माध्यमातूनही चांगले धार्मिक कार्य होते. सर्व जातींचे नागरिक येथील धार्मिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होत असतात. केडगावच्या जैन स्थानक परिसराचे सुशोभीकरण करण्यासाठी पेविंग ब्लॉक बसवणे व येथे सभामंडप उभारण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करू, असे आश्वासन उद्योजक सचिन कोतकर यांनी केले.

केडगाव येथे भगवान महावीर स्वामींच्या जयंतीनिमित्त भव्य शोभायात्रा ताराबाग ते जैनधार्मिक स्थानक पर्यंत काढण्यात आली. शोभायात्रेत मोठ्या संख्येने समाजातील नागरिक उत्साहात सहभागी झाले होते. महावीर जन्मोत्सवानिमित्त



जैन स्थानकामध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रम व जैन साध्वींचे आशीर्वचन झाले. यावेळी उद्योजक सचिन कोतकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. जैन श्रावक संघाचे फुलचंद चंगेड्या, पोपटलाल शिंगवी, प्रकाश मालू व बाबूशेठ चोरड्या यांच्या हस्ते सचिन कोतकर यांचा सत्कार करण्यात आला.युवक संघाचे प्रकाश चंगेड्या व अतुल शिंगवी यांनी जैन स्थानक परिसारत पेविंग ब्लॉक बसवणे व सभामंडप उभारणे आवश्यक असल्याचे सचिन कोतकर यांना सांगितले. या विनंतीला मान देऊन कोतकर यांनी त्वरित संदीप उद्योग समूहाच्या वतीने पेविंग ब्लॉक साठी दहा लाख रुपये मंजूर करून सभामंडपही देण्याचा शब्द दिला. यावेळी राहुल शिंगवी, विपुल कांकरिया,आनंद कटारिया, कमलेश गुंदेचा, राजेंद्र शिंगवी, अतुल शिंगवी, संतोष शेटीया,रुपेश गुगळे, राहुल शेटीया, जितेंद्र पोखरणा,धीरज चोरड्या,पारस शेटीया, कमलेश फिरोदिया, पीयूष बाफना, कुशल भंडारी, ललित गुगळे, रोशन चोरड्या, कमलेश पोखरणा, संतोष फिरोदिया आदींसह युवक, महिला व नागरिक उपस्थित होते.

# मुलीच्या हत्याप्रकरणी कठोर कारवाईची मागणी



**समाचार/नगर-दि.२३**

कर्नाटक राज्यातील हुबळी येथे १९ एप्रिल रोजी समाजातील आरोपी फैय्याज याने वीरशैव जंगम समाजाच्या नेहा हिरेमठ या मुलीवर एकतर्फी प्रेम प्रकरणातून अमानुषपणे हल्ला करून क्रूर हत्या केली. या हत्येचा आम्ही सर्व समाजबांधव निषेध व्यक्त करतो. आरोपी फैय्याज याला लवकरात लवकर कठोर शिक्षा करावी, अशी मागणी वीरशैव जंगम समाज प्रतिष्ठान, नगर शहर जंगम समाज संस्था, वीरशैव लिंगायत महासंघ यांच्या वतीने जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.यावेळी अध्यक्ष अशोक काटकर, डॉ. सुभाष बागले, अनिल नाईकवाडे, सुनील शेटे, सौरभ स्वामी, संतोष संबळे, कृष्णा संबळे व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

फैय्याज याने एकतर्फी प्रेमातून नेहा हिरेमठ हिचा निघृणपणे कॉलेज आवारामध्ये चाकुने अनेक वार करून खून केला. समाजातील प्रत्येकाचे मत आहे की हे प्रकरण जलदगती न्यायालयात चालवावे व कठोर शिक्षा (फाशीची) व्हायला हवी. असेही निवेदनात म्हटले आहे.

### डॉ. सर्जेराव निमसे यांना जीवन गौरव पुरस्कार प्रदान

# शिक्षक, प्राध्यापक देशाचे खरे हिरो -डॉ. देवळाणकर

**समाचार/नगर-दि.२३**

समाज घडविणारे शिक्षक, प्राध्यापक हे देशाचे खरे हिरो आहेत. देशाला सामाजिक स्थैर्य व विकासात्मक दिशा देण्याची भूमिका शिक्षण क्षेत्राच्या माध्यमातून होत असते. देश उभारणीसाठी शिक्षण क्षेत्राचे महत्त्वाचे स्थान आहे. बदलत्या काळानुरुप नवीन शिक्षण पध्दतीचा सर्वांना अवलंब करावा लागणार असून, विद्यार्थ्यांना ज्ञानाबरोबरच रोजगारक्षम बनवणे हेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे प्रमुख उद्दीष्ट असल्याचे प्रतिपादन उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी केले.



स्व. माधवराव दगडूजी मुळे प्रतिष्ठानच्या वतीने शिक्षणमहर्षी माधवराव मुळे जीवन गौरव पुरस्कार लखनऊ विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे यांना सपत्निक पाहुण्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी डॉ. देवळाणकर बोलत होते. जिल्हा परिषद शिक्षण विभागाचे श्रीराम थोरात यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम पार पडला. यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष मुकेश मुळे, उपाध्यक्ष दत्तापाटील नारळे, सचिव प्राचार्य एम.एम. तांबे, खजिनदार बजरंग पाडळकर आदी उपस्थित होते.

डॉ. देवळाणकर म्हणाले की, शिक्षण क्षेत्रात जीवनगौरव पुरस्कार कमी प्रमाणात दिले जातात. माजी कुलगुरु यांनी शिक्षण क्षेत्रात तब्बल ४० वर्ष दिलेल्या योगदानाबद्दल त्यांना हा सन्मान कौतुकास्पद आहे. नॅक मूल्यांकनसाठी त्यांनी केलेले कार्य दिशादर्शक असून, आज महाराष्ट्र राज्यातील महाविद्यालय नॅक मुल्यांकनात आघाडीवर आहे. शिक्षणाच्या माध्यमातून देश विकसित होतात. सीमेवर ज्याप्रमाणे सैनिक देशाचे रक्षण करतात, त्याचप्रमाणे शिक्षक नवीन शैक्षणिक धोरणातून नवभारत घडविणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रास्ताविक दत्तापाटील नारळे यांनी केले. डॉ. सर्जेराव निमसे म्हणाले की, आयुष्यात स्व. माधवराव मुळे (आबा) ही आगळी-वेगळी व्यक्ती भेटली. उद्यमशील व्यक्तिमत्व असल्याने त्यांनी अनेक उद्योग यशस्वी केले. अल्पशिक्षित राहून शिक्षण क्षेत्रात उत्तुंग कार्य उभे केले. कोणावरही मत लादले नाही. सामंजस्यपणा व जवळच्या व्यक्तीचे मनापासून प्रश्न सोडवायची त्यांची वृत्ती असल्याचे सांगितले. श्रीराम थोरात यांचेही भाषण झाले.

### निरीक्षणगृह व बालगृह संस्थेत बालक दत्तक विधान सोहळा

# अनाथ मुलांविषयी पालकांचा पुढाकार कौतुकास्पद - पाटील

**समाचार/नगर-दि.२३**

आज कुटुंबिक व अनाहूत परिस्थितीमुळे बालके अनाथ होत आहेत, अशा बालकांना शासनाच्यावतीने मुला-मुलींचे निरिक्षण गृह व बालगृहातून त्यांचा विकास साधला जात आहे. अशा अनाथ बालकांच्या मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने समाजाने पुढाकार घेणे आवश्यक आहे. या मुलांना आई-वडिलांची उणिव भासू न देण्यासाठी पालकांनी घेतलेला पुढाकार हा कौतुकास्पद आहे. या बालकांना दत्तक घेऊन त्यांच्या सर्वांगिण विकास या कुटूंबाच्या माध्यमातून होईल, असा विश्वास जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या सचिव भाग्यश्री पाटील यांनी व्यक्त केला.



मुला-मुलींचे निरिक्षण गृह व बालगृह संस्थेतील बालक दत्तक विधान सोहळा पार पडला. याप्रसंगी बाल न्याय मंडळ अध्यक्ष शुभांगी तामगाडे, डब्ल्यूएआयसीचे मॅनेजर संजय शेट्टी, सचिव विनिता गुणे, संस्थेचे उपाध्यक्ष ॲड.अच्युत चौधरी, सचिव ॲजड.गोविंद मिरीकर, ॲषड. जयवंत भापकर, शकिल फातिमा शेख, खजिनदार ॲजड.विश्वास आठरे, अधिक्षिका सौ.पौर्णिमा माने आदि उपस्थित होते.

प्रास्तविकात संस्थेच्या अधिक्षिका पौर्णिमा माने यांनी संस्थेच्या कार्याची माहिती दिली. यावेळी जिल्हा महिला बाल विकास अधिकारी महेंद्र दराडे व संरक्षण अधिकारी वैभव देशमुख यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले. याप्रसंगी शितल प्रभुणे, सीएसए संस्थेच्या लुसी मॅथ्यू, जुई झावरे, ओंकार सरोदे आदि उपस्थित होते. यावेळी या दत्तक मुला-मुलींचे मान्यवरांनी औक्षण उज्वल भविष्याच्या शुभेच्छा दिल्या. मनोगत व्यक्त करतांना पालक भावूक झाले होते.

### महायुती कार्यकर्त्यांच्या चांगुलपणाचे दर्शन

# मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या सभेनंतर चौपाटी कारंजा परिसराची साफसफाई

**समाचार/नगर-दि.२३**

भाजपाचे उमेदवार खा.सुजय विखे यांनी काल दुपारी शक्तीप्रदर्शन करीत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी शहरातून भव्य रॅली काढण्यात आली. या रॅलीचा समारोप दिर्ल्लीगेट येथील चौपाटी कारंजा परिसरात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सभेने झाली. ही सभज्ञ संपल्यानंतर महायुतीच्या कार्यकर्त्यांनी सभा पटांगणाची साफ सफाई करून एक आगळा वेगळा आदर्श लोकांसमोर ठेवला.

खा. विखे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत काल जिल्हाधिकारी कार्यालयात उमेदवारी अर्ज दाखल केला. ततपुर्वी त्यांनी नगर मधील सर्व महापुरूषांना अभिवादन केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापासून आपल्या प्रचार फेरीला सुरवात केली. यात असंख्य महिला, वृद्ध आणि कार्यकर्ते सामिल झाले होते.

कुणाला उन्हाचा फटका लागू नये, यासाठी पाण्याच्या बाटल्याची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी बाटल्यांचा खच निर्माण होऊन कचरा रस्त्यावर पसरू नये म्हणून काही कार्यकर्ते केवळ या बाटल्या जमा करून साफ सफाई करण्यात व्यस्त होते. दिल्ली गेट येथे या प्रचार रॅलीची सांगता झाल्यावर सभेचे आयोजन करण्यात आले होते. पण सभा संपल्यानंतर महायुतीच्या कार्यकर्त्यांनी या ठिकाणी साफ सफाई करत पटांगण स्वच्छ केले. कार्यकर्त्यांचा हा उपक्रम पाहून अनेकांना या गोष्टीचे कौतूक वाटले.

# बालचंद मालू यांचा रविवारी दीक्षा सोहळा

**समाचार/नगर-दि.२३**

येथील जैन समाजातील ज्येष्ठ व मुळा-प्रवरा वीज संस्थेचे सेवानिवृत्त अभियंता मनसुख चोरडीया यांचे सासरे तसेच महिला मंडळाच्या कार्यकर्त्या भारती मनसुख चोरडीया यांचे वडील बालचंद मालू (वय ८४, रा. पुणे) यांचा रविवार दि. २८ एप्रिल रोजी जैन भगवती दीक्षा महोत्सव सोहळा मेरठ येथे होणार आहे.

दीक्षार्थी बालचंदजी मालू हे श्रमण संघाचे सल्लागार गुरूदेव सुमतीप्रकाशजी, उपाध्यक्ष डॉ. विशालमुनीजी तसेच उत्तर भारतीय प्रवर्तक राष्ट्रसंत आशिष मुनीजी यांच्या सानिध्यात जैन संत होणार आहेत. दीक्षार्थी मालूजी सेवानिवृत्त प्राध्यापक आहेत. उपाध्याय प्रविणऋषिजी व प्रवर्तक आशिषमुनीजी यांच्या चातुर्मासामध्ये



दैनंदिन प्रवचनाचे संकलन करून वृत्तपत्रातून प्रसिद्धी देण्याचे काम केले. वर्तमान पत्रातील प्रवचन मालिकेवर स्वखर्चाने ऋषीवचन व आशिषधारा ही पुस्तके प्रकाशित केली आहेत. पुणे येथील जैन विद्यापीठाच्या प्राध्यापिका नलिनी जोशी यांच्या समवेत प्राकृत भाषेच्या डिक्शनरी तयार करण्यात त्यांचा मोठा सहभाग होता. या दीक्षा महोत्सवास नगर जिल्ह्यातील सकल जैन समाजाने उपस्थित रहावे, असे आवाहन श्रीरामपूर दीक्षा महोत्सव समिती व चातुर्मास समितीने केले आहे.

# शरद पवारांनी रामनाथ वाघ यांच्या आठवणींना दिला उजाळा

**समाचार/नगर-दि.२३**

ज्येष्ठनेते शरदचंद्र पवार यांनी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष स्व. रामनाथ वाघ यांचे सुपुत्र जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष जयंत वाघ यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. कुटुंबाच्या उच्चशिक्षणाबद्दलसदैव जागरूक असलेल्या स्वभावामुळे व उच्च विचारांमुळे आपल्या नव्या पिढीला दिशा देत घरातील प्रत्येकाला डॉक्टर बनवण्याचे स्वप्न रामनाथ वाघ यांनी साकार केले त्यांच्या या प्रेरणादाईवृत्तीचे कौतुक पवार यांनी केले. सध्या वाघ यांच्या कुटुंबात वीस डॉक्टर आहेत. याप्रकारे



शरद पवार आणि रामनाथ वाघ यांच्यामधील मैत्रीपूर्ण संबंधाच्या आठवणींना उजाळा दिला. शरद पवार १९६४ साली महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष होते त्यावेळी पवारांनी रामनाथ वाघ यांना जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष केले होते तेव्हापासून या दोघांमध्ये दृढ झालेल्या मैत्रीचे आणि एकमेकांच्या राजकीय कारकिर्दीचे साक्षीदार होण्यापर्यंतचा अनेक घटना व प्रसंगाचा उल्लेख या भेटीदरम्यान झाला.

स्व.रामनाथ वाघ यांनी तयार केलेल्या यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनावर आधारीत युगप्रवर्तक यशवंतराव ह्या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा सहकार सभागृह येथे १ जानेवारी २००८ रोजी शरद पवार यांच्या उपस्थितीत झाला. या तब्बल ८०० पानांच्या ग्रंथामधे यशवंतराव चव्हाण यांनी वेगवेगळ्या अनेक खात्यामधे केंद्रीय मंत्री म्हणुन भुषविलेल्या कारकिर्दीमधील ४५०पेक्षा जास्त दुर्मिळ फोटोचा समावेश करण्यात आलेला आहे. तसेच १ ऑक्टोबर २०१८ रोजी रामनाथ वाघ यांच्या वळून पाहतानाया आत्मचरित्राचा आणि कृतार्थ जीवनप्रवास ह्या गौरवग्रंथाचा प्रकाशन सोहळा ही हस्ते करण्यात आला. यावेळी डॉ.अनिल आठरे, डॉ कृतिका,डॉ धनंजय, डॉ सुमा, डॉ सागर, डॉ मृणाल, अभिजित,दुर्गा आदी उपस्थित होते.

### भक्तीगीतांनी आनंदधाम परिसर मंत्रमुग्ध

# डॉ. श्रध्दा व सृष्टी जगताप यांच्या सुरेल सुरांना उपस्थितांची दाद




**समाचार/नगर-दि.२३**

जैन सोशल फेडरेशनच्यावतीने भगवान महावीर स्वामी जयंतीनिमित्त रविवारी सायंकाळी आयोजित भक्तीसंध्या कार्यक्रमातील समधुर गीते, भजनांमुळे वातावरण प्रफुल्लित बनले होते. इंदौर येथील प्रसिध्द गायिका डॉ.श्रध्दा जगताप व सृष्टी जगताप या आई व मुलीच्या जोडीने एकाहून एक सरस गीते सादर करीत उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. जगताप यांच्या जादूई आवाजाची मोहिनी उपस्थितांना पडली.

भगवान महावीर स्वामी जयंतीनिमित्त दरवर्षी जैन सोशल फेडरेशनतर्फे आनंदधामच्या प्रांगणात प्रबुध्द विचारक पूज्य आदर्शऋषीजी यांच्या प्रेरणेने भक्तीसंध्येचा कार्यक्रम घेण्यात येतो. यंदाही या कार्यक्रमाला उदंड प्रतिसाद मिळाला. जगताप मायलेकीच्या ऐ मालिक तेरे बंदे हम, ओ पालन हारे, कृपा अपनी सदा, जय जय हे त्रिशला नंदन, जन्मे है महावीर प्यारे, सत्यम शिवम सुंदरम, इक राधा इक मीरा, गणनायकाय गणदैवताय, ज्योत से ज्योत जगाते चलो, तू प्यार का सागर है, ऐरणीच्या देवा तुला, जय बोलो महावीर स्वामी की, मेरी लगी गुरु संग प्रीत अशा गीतांना वातावरण भारावून गेले होते. उपस्थितांना खिळवून ठेवणारे जादूई सूर, संगीत कार्यक्रमाचे वैशिष्ट्ये ठरले. वंदे मातरम् गीताने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी प्रत्येकाच्या मनात देशप्रेमाचा अभिमान जागृत झाला.

या भक्तीसंध्या कार्यक्रमात आपल्या अद्भुत कलेने रंग भरणाऱ्या डॉ.श्रध्दा व सृष्टी जगताप यांचा कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या अनिता सचिन भंडारी, पल्लवी अमोल पटवा, वैशाली राजेंद्र गांधी, आनंद बोरा, गिरीश शिंगी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमासाठी जैन सोशल फेडरेशनच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

# राज्यस्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धेत १६ संघांचा सहभाग



**समाचार/नगर-दि.२३**

सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालय व कृषी विद्यापीठच्या (ता. राहुरी) मैदानावर वरिष्ठ वयोगटातील पुरुष व महिला यांच्या राज्यस्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धेला प्रारंभ झाला. टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र यांच्या मान्यतेने व अहमदनगर जिल्हा टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या सहकार्याने ही स्पर्धा होत आहे. राज्यभरातून विविध संघांनी यामध्ये सहभाग नोंदवला आहे.

या स्पर्धेचे उद्घाटन सावित्रीबाई फुले शिक्षण मंडळाचे सचिव डॉ. महानंद माने यांच्या हस्ते झाले. यावेळी टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्राच्या सचिव मीनाक्षी गिरी, सावित्रीबाई फुले प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक बाळासाहेब खेत्री, सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयाचे उपप्राचार्य बाळासाहेब डोंगरे, पर्यवेक्षक मनोज बावा, महेश मिश्रा, संदीप पाटील, टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्राचे खजिनदार धनश्री गिरी, घन:श्याम सानप आदी उपस्थित होते. डॉ. माने म्हणाले की, खेळामुळे आरोग्य उत्तम राहून मानसिक स्वास्थ्य देखील चांगले राहते. खेळाने एकाग्रता वाढत असून, विद्यार्थ्यांनी मैदानी खेळाकडे वळण्याचे त्यांनी आवाहन केले. २२ ते २४ एप्रिल दरम्यान पुरुष व महिला यांच्या राज्यस्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धा रंगणार आहेत. वरिष्ठ गटातील स्पर्धे साठी राज्यातून सोळा संघ सहभागी झाले असून, मुलींचे ८ संघ सहभागी आहेत. यामध्ये ३०० खेळाडूंनी सहभाग नोंदवला असून, नाशिक, अहमदनगर, सांगली, बीड, हिंगोली, जालना, बुलढाणा, लातूर आदी जिल्ह्यातील संघांचा समावेश आहे.

## जाहीर नोटीस

घ. नं. ५१०/भिंगार/२०२४-२५
छावनी परिषद कार्यालय, अहमदनगर
दिनांक : २३/०४/२०२४

या नोटिसीद्वारे जाहीर करण्यात येते की, १) श्री. विजय रमेश शहाणे, वय : ४७ वर्षे, धंदा : व्यापार, २) श्री.अनंत रमेश शहाणे, वय : ४४ वर्षे, धंदा : व्यापार, दोघेही राहणार ब्राह्मणगल्ली, भिंगार, अहमदनगर यांनी घर नं. ५१०, भिंगार सर्व्हे नं. २११/६४९, भिंगार, अहमदनगर छावनी परिषद हे रजिस्टर खरेदीखत क्र. १६१५/२०२४ दि.१३/०२/२०२४ च्या आधारावर आपले नावावर वर्ग/दाखल होणेसाठी या कार्यालयाकडे रितसर अर्ज व कागदपत्र दाखल केले आहेत. सदर बाबतीत ज्या कोणास कोणत्याही प्रकारे गहाण, दान, बक्षीस, खरेदी हक्क, हितसंबंध असेल वा अन्य कोणत्याही कारणामुळे हरकत घ्यावयाची असेल, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० (तीस) दिवसांच्या आत सबळ कागदपत्रांच्या पुराव्यासह मे. कार्यकारी अधिकारी छावनी परिषद, अहमदनगर यांच्याकडे तसे लेखी कळवावे.

सदर मुदतीनंतर आलेल्या हक्क/हरकतीवर विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

घर नं. ५१०, भिंगार
क्षेत्रफळ : ६२८.०० चौ. फू.

सौ. एस. एम. पारनाईक
कार्यालय अधीक्षक
कृते मुख्य अधिशासी अधिकारी,
अहमदनगर छावनी परिषद
(विक्रांत मोरे)


टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात
दिनांक - १९ एप्रिल ते २५ एप्रिल २०२४




| | |
|---|---|
| बडे मियाँ छोटे मियाँ | 8.00 AM<br>11.10 AM<br>02.15 PM<br>07.00 PM<br>11.00 PM |
| मैदान | 8.30 AM,12.00 PM<br>6.45 PM,10.15 PM |
| स्वातंत्र्यवीर सावरकर | 03.25 PM |
| GODZILLA X KONG | 5.30 PM |
| CREW | 01.25 PM<br>10.30 PM |
| राजकारण गेलं मिशीत | 04.00 PM |
| द लिगसी ऑफ जिनेश्वर | 10.00 AM<br>07.40 PM |

for screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher *
- Offer Vaild On Window Booking & Phone Booking
Ahmednagar's First & Most Luxurlous Cinematic Paradlse

AVAILABLE ON book my show CONNPLEX AVAILABLE ON book my show

3" Floor, Kohinoor Mall, Premdan chowk, Savedi, A. Nagar.
Mo. 6353564618 / 7790094001 / 7790094002



शेंदूर, गुलाल, कुंकू, भंडारा, भाजकी (काळी) माती, क्रिस्ट्रल रांगोळी, कलर रांगोळी, मीठ, नुडल्स, बांधकाची रांगोळी

M डागा
शांतीलाल डागा
दाळमंडई/मार्केट यार्ड, अहमदनगर.
फोन नं. ७५८८११५१५७, ९८२२०८१४४०


## नगर अर्बन को-ऑप.बँक लि.,अहमदनगर (मल्टी-स्टेट शेडयुल्ड बँक), अहमदनगर U/L

बँक रोड, पोस्ट बॉक्स नं. ७, अहमदनगर - ४१४ ००१.

### ताबा नोटीस

रुल८(१) नुसार

ज्याअर्थी प्राधिकृत अधिकारी नगर अर्बन को. ऑप. बँक ली. अहमदनगर (मल्टि स्टेट शेड्युल्ड बँक) यांनी सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अँसेट्स अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (ऍक्ट) २००२ ( 54 of 2002 ) अन्वये सदर कायद्याचे कलम १३ (१२) व नियम ८ अन्वये **मे न्यू पलक एजन्सी प्रो.प्रा.श्री अशोक लालचंद देसर्डा व जामिनदार** यांना दिनांक १७/०७/२०२१ रोजी मागणी नोटीस पाठवून त्यांना दिलेल्या अ) नजर गहाण कर्जाची दिनांक ३०/०६/२०२१ ची येणेबाकी रक्कम रु. २,६६,८०,३९९/- (अक्षरी रु.दोन कोटी सहासष्ट लाख ऐंशी हजार तीनशे नव्यानव फक्त) + दि. ०१/०७/२०२१ पासून त्यावरील होणारे व्याज ब) खेळते भांडवल कर्जाची दिनांक ३०/०६/२०२१ ची येणेबाकी रक्कम रु. ३,४२,१२,६१६/- (अक्षरी रु.तीन कोटी बेचाळीस लाख बारा हजार सहाशे सोळा फक्त ) +दिनांक ०१/०७/२०२१ पासून त्यावरील होणारे व्याज असे एकुण रक्कम रुपये ६,०८,९३,०१५/-(अक्षरी रुपये सहा कोटी आठ लाख त्रयानव हजार पंधरा फक्त ) + दिनांक ०१/०७/२०२१ पासून त्यावरील होणारे व्याज अशी एकूण रक्कम ६० दिवसाचे आत भरणा करणेची मागणी केलेली होती.

परंतु ज्याअर्थी वर उल्लेख केलेले कर्जदार त्यांचे जामीनदार यांनी नोटिसी मध्ये मागणी केलेल्या रकमेचा भरणा केलेला नसल्याने उपरोक्त कर्जदार व त्यांचे जामीनदार आणि तमाम लोकांना कळविण्यात येते कि, सीक्युरिटायझेशन कायदा कलम १३(४) व नियम ८ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार खाली सही करणारे प्राधिकृत अधिकारी यांनी खाली उल्लेख केलेल्या मिळकतीचा **प्रतिकात्मक ताबा दिनांक १८/०४/२०२४** रोजी घेतला असून विशेषतः उपरोक्त कर्जदार, जामीनदार व सामान्य तमाम जनतेस कळविण्यात येते कि, सदर मालमत्तेबाबत कसलाही व्यवहार करण्यात येऊ नये आणि सदर मालमत्तेच्या कोणत्याही व्यवहारावर नगर अर्बन को-ऑप. बँक ली. अहमदनगर (मल्टि स्टेट शेड्युल्ड बँक) यांची अ) नजर गहाण कर्जाची दिनांक ३०/०६/२०२१ ची येणेबाकी रक्कम रु. २,६६,८०,३९९/- (अक्षरी रु.दोन कोटी सहासष्ट लाख ऐंशी हजार तीनशे नव्यानव फक्त) + दि. ०१/०७/२०२१ पासून त्यावरील होणारे व्याज ब) खेळते भांडवल कर्जाची दिनांक ३०/०६/२०२१ ची येणेबाकी रक्कम रु. ३,४२,१२,६१६/- (अक्षरी रु.तीन कोटी बेचाळीस लाख बारा हजार सहाशे सोळा फक्त ) +दिनांक ०१/०७/२०२१ पासून त्यावरील होणारे व्याज असे एकुण रक्कम रुपये ६,०८,९३,०१५/-(अक्षरी रुपये सहा कोटी आठ लाख त्रयानव हजार पंधरा फक्त ) +दिनांक ०१/०७/२०२१ पासून त्यावरील होणारे व्याजाच्या रक्कमेसह बोजा राहील.

**अ) कर्जदार श्री. अशोक लालचंद देसर्डा यांच्या नावावरिल असलेल्या अचलमालमत्तेचे वर्णन:-**

१) डिस्ट्रिक्ट अहमदनगर सब डिस्ट्रिक्ट अहमदनगर तसेच अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मा.दुय्यम निबंधक साहेब,यांचे कार्यक्षेत्रातील मौजे नालेगाव येथील १) गट नं.१५०/१५१/१५९/१/१५९/२ प्लॉट नं.१८१/१८६/६ चे क्षेत्र ५४ चौ.मी. २) गट नं.१५०/१५१/१५९/१/१५९/२ प्लॉट नं.१८१/१८६/७ चे क्षेत्र ५४ चौ.मी.३) गट नं.१५०/१५१/१५९/१/१५९/२ प्लॉट नं.१८१/१८६/८ चे क्षेत्र ५४ चौ.मी. ४) गट नं.१५०/१५१/१५९/१/१५९/२ प्लॉट नं.१८१/१८६/९ चे क्षेत्र ५४ चौ.मी.५) गट नं.१५०/१५१/१५९/१/१५९/२ प्लॉट नं.१८१/१८६/१० चे क्षेत्र १०५ चौ.मी.लिहुन देणार नं.२ याची मिळकत तारण गहाण दिली असे यांसी एकत्रीत चतु: सीमा खालील प्रमाणे :-

**पूर्वस :-** प्लॉट नं .१९५ १९६ **दक्षिणेस:-** रस्ता
**पश्चिमेस:-** प्लॉट नं.१८१ / १८६ /११ **उत्तरेस :-** प्लॉट नं.१८१ /१८६/५

तारीख : १८/०४/२०२४
ठिकाण : मौजे नालेगाव
तालुका- नगर
जिल्हा-अहमदनगर

**प्राधिकृत अधिकारी**
नगर अर्बन को. ऑप.बँक
(मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक)
केंद्राशासानाधिन अवसायाना अंतर्गत, अहमदनगर.


## बागायत शेत जमीन विकणे आहे

वांबोरी पांढरीपूल रोडवरील रोडटच १५ एकर शेती, संपूर्ण पीव्हीसी पाईपलाईन केलेली, भरपूर पाणी असलेली व वीटभट्टी आणि पशुखाद्य दुकानासहित विकणे आहे. (पांढरीपुलापासून ७ कि. मी. अंतरावर)

संपर्क मो. :- 9423783275, 9373231010, 9423782545


## जाहीर नोटीस

घ. नं. ४५९/भिंगार/२०२४-२५
छावनी परिषद कार्यालय, अहमदनगर
दिनांक : १५/०४/२०२४

या नोटिसीद्वारे जाहीर करण्यात येते की, श्री. अतुल विनायक मुळे, वय : ५८ वर्षे, धंदा : नोकरी, राहणार ४५९, एम. जी. रोड, ब्राह्मण लेन, दत्त मंदिरसमोर, भिंगार, अहमदनगर यांनी घर नं. ४५९, सर्व्हे नं. २११-४८६, भिंगार, अहमदनगर छावनी परिषद हे १) रजिस्टर मृत्यूपत्र क्र. ३३१/१५, दि. २१/०१/२०१५. २) रजिस्टर हक्कसोड पत्र क्र. ६२५५/२०२३ दि. २७/०७/२०२३ च्या आधारावर आपले नावावर वर्ग/दाखल होणेसाठी या कार्यालयाकडे रितसर अर्ज व कागदपत्र दाखल केले आहेत. सदर बाबतीत ज्या कोणास कोणत्याही प्रकारे गहाण, दान, बक्षीस, खरेदी हक्क, हितसंबंध असेल वा अन्य कोणत्याही कारणामुळे हरकत घ्यावयाची असेल, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० (तीस) दिवसांच्या आत सबळ कागदपत्रांच्या पुराव्यासह मे. कार्यकारी अधिकारी छावनी परिषद, अहमदनगर यांच्याकडे तसे लेखी कळवावे.

सदर मुदतीनंतर आलेल्या हक्क/हरकतीवर विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

घर नं. ४५९, भिंगार
क्षेत्रफळ : ५५०.०० चौ. फू.

सौ. एस. एम. पारनाईक
कार्यालय अधीक्षक
कृते मुख्य अधिशासी अधिकारी,
अहमदनगर छावनी परिषद
(विक्रांत मोरे)

## जाहीर नोटीस

घ. नं. ६०१-बी/भिंगार/२०२४-२५
छावनी परिषद कार्यालय, अहमदनगर
दिनांक : १५/०४/२०२४

या नोटिसीद्वारे जाहीर करण्यात येते की, श्री. अतुल विनायक मुळे, वय : ५८ वर्षे, धंदा : नोकरी, राहणार ४५९, एम. जी. रोड, ब्राह्मण लेन, दत्त मंदिरसमोर, भिंगार, अहमदनगर यांनी घर नं. ६०१-बी, सर्व्हे नं. २११-४८७-बी, भिंगार, अहमदनगर छावनी परिषद हे १) रजिस्टर मृत्यूपत्र क्र. ३३१/१५, दि. २१/०१/२०१५, २) रजिस्टर हक्कसोड पत्र क्र. ६२५५/२०२३ दि. २७/०७/२०२३ च्या आधारावर आपले नावावर वर्ग/दाखल होणेसाठी या कार्यालयाकडे रितसर अर्ज व कागदपत्र दाखल केले आहेत. सदर बाबतीत ज्या कोणास कोणत्याही प्रकारे गहाण, दान, बक्षीस, खरेदी हक्क, हितसंबंध असेल वा अन्य कोणत्याही कारणामुळे हरकत घ्यावयाची असेल, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० (तीस) दिवसांच्या आत सबळ कागदपत्रांच्या पुराव्यासह मे. कार्यकारी अधिकारी छावनी परिषद, अहमदनगर यांच्याकडे तसे लेखी कळवावे.

सदर मुदतीनंतर आलेल्या हक्क/हरकतीवर विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

घर नं. ६०१-बी, भिंगार
क्षेत्रफळ : ७३.०० चौ. फू.

सौ. एस. एम. पारनाईक
कार्यालय अधीक्षक
कृते मुख्य अधिशासी अधिकारी,
अहमदनगर छावनी परिषद
(विक्रांत मोरे)

## जाहीर नोटीस

घ. नं. ६०१-ए/भिंगार/२०२४-२५
छावनी परिषद कार्यालय, अहमदनगर
दिनांक : १५/०४/२०२४

या नोटिसीद्वारे जाहीर करण्यात येते की, श्री. अतुल विनायक मुळे, वय : ५८ वर्षे, धंदा : नोकरी, राहणार घर नं. ४५९, एम. जी. रोड, ब्राह्मण लेन, दत्त मंदिरसमोर, भिंगार, अहमदनगर यांनी घर नं. ६०१-ए, सर्व्हे नं. २११-४८७-ए, भिंगार, अहमदनगर छावनी परिषद हे १) रजिस्टर मृत्यूपत्र क्र. ३३१/१५, दि. २१/०१/२०१५. २) रजिस्टर हक्कसोड पत्र क्र. ६२५५/२०२३ दि. २७/०७/२०२३ च्या आधारावर आपले नावावर वर्ग/दाखल होणेसाठी या कार्यालयाकडे रितसर अर्ज व कागदपत्र दाखल केले आहेत. सदर बाबतीत ज्या कोणास कोणत्याही प्रकारे गहाण, दान, बक्षीस, खरेदी हक्क, हितसंबंध असेल वा अन्य कोणत्याही कारणामुळे हरकत घ्यावयाची असेल, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० (तीस) दिवसांच्या आत सबळ कागदपत्रांच्या पुराव्यासह मे. कार्यकारी अधिकारी छावनी परिषद, अहमदनगर यांच्याकडे तसे लेखी कळवावे.

सदर मुदतीनंतर आलेल्या हक्क/हरकतीवर विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

घर नं. ६०१-ए, भिंगार
क्षेत्रफळ : २६३.०० चौ. फू.

सौ. एस. एम. पारनाईक
कार्यालय अधीक्षक
कृते मुख्य अधिशासी अधिकारी,
अहमदनगर छावनी परिषद
(विक्रांत मोरे)

## नगर अर्बन को-ऑप.बँक लि.,अहमदनगर (मल्टी-स्टेट शेडयुल्ड बँक), अहमदनगर U/L

बँक रोड, पोस्ट बॉक्स नं. ७, अहमदनगर - ४१४ ००१.

### ताबा नोटीस

रुल८(१) नुसार

ज्याअर्थी प्राधिकृत अधिकारी नगर अर्बन को. ऑप. बँक ली. अहमदनगर (मल्टि स्टेट शेड्युल्ड बँक) यांनी सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अँसेट्स अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (ऍक्ट)२००२ ( 54 of 2002 ) अन्वये सदर कायद्याचे कलम १३ (१२) व नियम ८ अन्वये **श्री.गणेश अशोक तांबे व जामिनदार** यांना दिनांक १४/०७/२०२१ रोजी मागणी नोटीस पाठवून त्यांना दिलेल्या घरबांधणी कर्जाची दिनांक ३०/०६/२०२१ ची येणेबाकी रक्कम रु. ५२,१०,३८६/- (अक्षरी रु. बावन्न लाख दहा हजार तीनशे शेहयांऐंशी फक्त) व दि. ०१/०७/२०२१ पासून त्यावरील होणारे व्याज अशी एकूण रक्कम ६० दिवसाचे आत भरणा करणेची मागणी केलेली होती.

परंतु ज्याअर्थी वर उल्लेख केलेले कर्जदार त्यांचे जामीनदार यांनी नोटिसी मध्ये मागणी केलेल्या रकमेचा भरणा केलेला नसल्याने उपरोक्त कर्जदार व त्यांचे जामीनदार आणि तमाम लोकांना कळविण्यात येते कि, सीक्युरिटायझेशन कायदा कलम १३(४) व नियम ८ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार खाली सही करणारे प्राधिकृत अधिकारी यांनी खाली उल्लेख केलेल्या मिळकतीचा **प्रतिकात्मक ताबा दिनांक १८/०४/२०२४** रोजी घेतला असून विशेषतः उपरोक्त कर्जदार, जामीनदार व सामान्य तमाम जनतेस कळविण्यात येते कि, सदर मालमत्तेबाबत कसलाही व्यवहार करण्यात येऊ नये आणि सदर मालमत्तेच्या कोणत्याही व्यवहारावर नगर अर्बन को-ऑप. बँक ली. अहमदनगर (मल्टि स्टेट शेड्युल्ड बँक) यांची घरबांधणी कर्जाची दिनांक ३०/०६/२०२१ ची येणेबाकी रक्कम रु. ५२,१०,३८६/- (अक्षरी रु. बावन्न लाख दहा हजार तीनशे शेहयांऐंशी फक्त) व दि. ०१/०७/२०२१ पासून त्यावरील होणारे व्याजच्या रक्कमेसह बोजा राहील.

**अ) कर्जदार श्री.गणेश अशोक तांबे यांच्या नावावरिल असलेल्या अचलमालमत्तेचे वर्णन:-**

१) डिस्ट्रिक्ट अहमदनगर सब डिस्ट्रिक्ट अहमदनगर ता.पंचायत व पंचायत समिती अहमदनगर पैकी मा.दुय्यम निबंधक साहेब,यांचे कार्यक्षेत्रातील अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील नालेगाव राजवीर पार्क -बी या रो बंगलो स्किम येथील सर्वेनं.१५०/१५१/१५९/१/१५९/२ मधिल प्लॉट नं.१८१ ते १८६ १२ (संगणीकृतस .नं. ५०/ १५१/१५९ /१/ १५९/ २/ प्लॉट १८१/१८६/१२ चे एकुण क्षेत्र ५४.०० चौमी. हा संपुर्ण प्लॉट व त्यावरील असलेले आरसीसी बांधकाम मधील तळमजलाचे बांधकाम क्षेत्र ३२.०५ चौ.मी.व पहिल्या मजल्याचे बांधकाम क्षेत्र २७.३३ चौ.मी.)असे एकुण बांधकाम क्षेत्र ५९.३८ चौ.मी.या प्रमाणेची रो हाऊस घर मिळकत यासी चतु: सीमा खालील प्रमाणे :-

**पूर्वेस :-** प्लॉट नं .१९७ **पश्चिमेस:-** ९ मी.रस्ता
**दक्षिणेस:-** प्लॉट नं.१८१ ते १८६ / ११ **उत्तरेस :-** प्लॉट नं. १८१ ते १८६/१३

तारीख : १८/०४/२०२४
ठिकाण : नालेगाव,नगर
तालुका- नगर जिल्हा-अहमदनगर

**प्राधिकृत अधिकारी**
नगर अर्बन को. ऑप.बँक
(मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक)
केंद्राशासानाधिन अवसायाना अंतर्गत, अहमदनगर.

## नगर अर्बन को-ऑप.बँक लि.,अहमदनगर (मल्टी-स्टेट शेडयुल्ड बँक), अहमदनगर U/L

बँक रोड, पोस्ट बॉक्स नं. ७, अहमदनगर - ४१४ ००१.

### ताबा नोटीस

रुल८(१) नुसार

ज्याअर्थी प्राधिकृत अधिकारी नगर अर्बन को. ऑप. बँक ली. अहमदनगर (मल्टि स्टेट शेड्युल्ड बँक) यांनी सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अँसेट्स अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (ऍक्ट)२००२ ( 54 of 2002 ) अन्वये सदर कायद्याचे कलम १३ (१२) व नियम ८ अन्वये **श्री.गणेश बबनराव राजापुरे व जामिनदार** यांना दिनांक १४/०७/२०२१ रोजी मागणी नोटीस पाठवून त्यांना दिलेल्या घरबांधणी कर्जाची दिनांक ३०/०६/२०२१ ची येणेबाकी रक्कम रु. ५२,०८,४२२/- (अक्षरी रु. बावन्न लाख आठ हजार चारशे बावीस फक्त) व दि. ०१/०७/२०२१ पासून त्यावरील होणारे व्याज अशी एकूण रक्कम ६० दिवसाचे आत भरणा करणेची मागणी केलेली होती.

परंतु ज्याअर्थी वर उल्लेख केलेले कर्जदार त्यांचे जामीनदार यांनी नोटिसी मध्ये मागणी केलेल्या रकमेचा भरणा केलेला नसल्याने उपरोक्त कर्जदार व त्यांचे जामीनदार आणि तमाम लोकांना कळविण्यात येते कि, सीक्युरिटायझेशन कायदा कलम १३(४) व नियम ८ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार खाली सही करणारे प्राधिकृत अधिकारी यांनी खाली उल्लेख केलेल्या मिळकतीचा **प्रतिकात्मक ताबा दिनांक १८/०४/२०२४** रोजी घेतला असून विशेषतः उपरोक्त कर्जदार, जामीनदार व सामान्य तमाम जनतेस कळविण्यात येते कि, सदर मालमत्तेबाबत कसलाही व्यवहार करण्यात येऊ नये आणि सदर मालमत्तेच्या कोणत्याही व्यवहारावर नगर अर्बन को-ऑप. बँक ली. अहमदनगर (मल्टि स्टेट शेड्युल्ड बँक) यांची घरबांधणी कर्जाची दिनांक ३०/०६/२०२१ ची येणेबाकी रक्कम रु. ५२,०८,४२२/- (अक्षरी रु. बावन्न लाख आठ हजार चारशे बावीस फक्त) व दि. ०१/०७/२०२१ पासून त्यावरील होणारे व्याजच्या रक्कमेसह बोजा राहील.

**अ) श्री.गणेश बबनराव राजापुरे यांच्या नावावरिल असलेल्या अचलमालमत्तेचे वर्णन:-**

१) डिस्ट्रिक्ट अहमदनगर सब डिस्ट्रिक्ट अहमदनगर ता.पंचायत व पंचायत समिती अहमदनगर पैकी मा.दुय्यम निबंधक साहेब,यांचे कार्यक्षेत्रातील अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील नालेगाव राजवीर पार्क-बी या रो बंगलो स्किम येथील स.नं.१५०/ १५१ / १५९/१/१५९/२/ मधिल प्लॉट नं.१८१ ते १८६/१३ (संगणीकृत स.नं.१५०/१५१ /१५९/१ / १५९/२/ प्लॉट १८१/१८६/१३ चे एकुण क्षेत्र ५४.०० चौमी. हा संपुर्ण प्लॉट व त्यावरील असलेले आरसीसी बांधकाम मधील तळमजलाचे बांधकाम क्षेत्र ३२.०५ चौ.मी.व पहिल्या मजल्याचे बांधकाम क्षेत्र २७.३३ चौ.मी.)असे एकुण बांधकाम क्षेत्र ५९.३८ चौ.मी.या प्रमाणेची रो हाऊस घर मिळकत यासी चतु: सीमा खालील प्रमाणे :-

**पूर्वेस :-** प्लॉट नं .१९७ **दक्षिणेस:-** प्लॉट नं.१८१ ते १८६ / १२
**पश्चिमेस:-** ९ मी.रस्ता **उत्तरेस :-** प्लॉट नं. १८१ ते १८६/१४

तारीख : १८/०४/२०२४
ठिकाण : नालेगाव,नगर
तालुका- नगर जिल्हा-अहमदनगर

**प्राधिकृत अधिकारी**
नगर अर्बन को. ऑप.बँक
(मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक)
केंद्राशासानाधिन अवसायाना अंतर्गत, अहमदनगर.

## नगर अर्बन को-ऑप.बँक लि.,अहमदनगर (मल्टी-स्टेट शेडयुल्ड बँक), अहमदनगर U/L

बँक रोड, पोस्ट बॉक्स नं. ७, अहमदनगर - ४१४ ००१.

### ताबा नोटीस

रुल८(१) नुसार

ज्या अर्थी प्राधिकृत अधिकारी नगर अर्बन को. ऑप. बँक ली. अहमदनगर (मल्टि स्टेट शेड्युल्ड बँक) यांनी सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अँसेट्स अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटीइंटरेस्ट (ऍक्ट) २००२ ( 54 of 2002 ) अन्वये सदर कायद्याचे कलम १३ (१२) व नियम ८ अन्वये **श्री.उपाध्ये महेंद्र संतोष आणि त्यांचे जामीनदार** यांना दिनांक १२/१०/२०२१ रोजी मागणी नोटीस पाठवून घरबांधणी कर्जाकरिता दिनांक ३०/०९/२०२१ ची येणेबाकी रक्कम रूपये ४२,३८,९५६/- (अक्षरी बेचाळीस लाख अडौतीस हजार नउशे छपन्न फक्त ) + ०१/१०/२०२१ त्यावरी व्याज ६० दिवसाचे आत भरणा करणेची मागणी केलेली होती.

परंतु ज्या अर्थी वर उल्लेख केलेले कर्जदार श्री.उपाध्ये महेंद्र संतोष आणि त्यांचे जामीनदार यांनी नोटिसीमध्ये मागणी केलेल्या रकमेचा भरणा केलेला नसल्याने उपरोक्त कर्जदार व त्यांचे जामीनदार आणि तमाम लोकांना कळविण्यात येते कि, सीक्युरिटायझेशन कायदा कलम १३(४) व नियम ८ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार खाली सही करणारे प्राधिकृत अधिकारी यांनी खाली उल्लेख केलेल्या मिळकतीचा **प्रतीकात्मक ताबा दिनांक १६/०४/२०२४** रोजी घेतला असून विशेषतः उपरोक्त कर्जदार, जामीनदार व अन्य आणि सामान्य तमाम जनतेस कळविण्यात येते कि, सदर मालमत्तेबाबत कसलाही व्यवहार करण्यात येऊ नये आणि सदर मालमत्तेच्या कोणत्याही व्यवहारावर नगर अर्बन को-ऑप. बँक ली. अहमदनगर (मल्टि -स्टेट शेड्युल्ड बँक) यांची घरबांधणी कर्जाकरिता दिनांक ३०/०९/२०२१ ची येणेबाकी रक्कम रूपये ४२,३८,९५६/- (अक्षरी बेचाळीस लाख अडौतीस हजार नउशे छपन्न फक्त ) + ०१/१०/२०२१ त्यावरील होणारे व्याजच्या रक्कमेसह बोजा राहील.

**अ ) कर्जदार श्री. उपाध्ये महेंद्र संतोष यांच्या नावावरील असलेल्या अचलमालमत्तेचे वर्णन:-**

१) जिल्हा अहमदनगर ,पोटतुकडी व तालुका नगरपैकी, महानगरपालिका हद्दीतील मौजे चाहुराणा बुद्रुक येथील खालील मिळकत वर्णन सर्व्हे नंबर ५४/२,प्लॉट नंबर २१,चे ३५६.८८ चौ.मी.तसेच स्टिल्ट थर्ड फलोअरमधील निवासी सदनिका (फलॅट) नं.३०३ याचे फलॅट कारपेट क्षेत्र ३३.१९ चौ.मीटर याचे बिल्टअप क्षेत्र ३७.९० चौ.मी.,कॉमन स्टेअरकेस,लिफट व पॅसेज कारपेट क्षेत्र ५.२७ चौ.मी.,याचे बिल्टअप ५.३३ चौ.मी.असे एकुण कारपेट क्षेत्र ३८.४६ चौ.मी. याचे बिल्टअप क्षेत्र ४३.२३ चौ.मी.व बाल्कनी कारपेट क्षेत्र १९.३८ चौ.मी.याचे बिल्टअप क्षेत्र २१.७४ चौ.मी. असे.यांसी चतु:सिमा खालीलप्रमाणे-

**पुर्वेस:-** प्लॉट रिअर मार्जिन. **दक्षिणेस:-** प्लॉट साईड मार्जिन
**पश्चिमेस:-** स्टेअरकेस व लिफट **उत्तरेस:-** फलॅट नंबर३०२

दिनांक :-१६/०४/२०२४
ठिकाण : मु.पो चाहुराणा बुद्रुक,
तालुका- नगर,
जिल्हा- अहमदनगर

**प्राधिकृत अधिकारी**
नगर अर्बन को. ऑप.बँक
(मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक)
केंद्राशासानाधिन अवसायाना अंतर्गत, अहमदनगर.

## नगर अर्बन को-ऑप.बँक लि.,अहमदनगर (मल्टी-स्टेट शेडयुल्ड बँक), अहमदनगर U/L

बँक रोड, पोस्ट बॉक्स नं. ७, अहमदनगर - ४१४ ००१.

### ताबा नोटीस

रुल८(१) नुसार

ज्या अर्थी प्राधिकृत अधिकारी नगर अर्बन को. ऑप. बँक ली. अहमदनगर (मल्टि स्टेट शेड्युल्ड बँक) यांनी सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अँसेट्स अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटीइंटरेस्ट (ऍक्ट)२००२ ( 54 of 2002 ) अन्वये सदर कायद्याचे कलम १३ (१२) व नियम ८ अन्वये **श्री. उपाध्ये आरती महेंद्र आणि त्यांचे जामीनदार** यांना दिनांक १६/१०/२०२१ रोजी मागणी नोटीस पाठवून घरबांधणी कर्जाकरिता दिनांक ३०/०९/२०२१ ची येणेबाकी रक्कम रूपये ४२,४८,८४५/- (अक्षरी बेचाळीस लाख अठ्ठेचाळीस हजार आठशे पंचेचाळीस फक्त ) + ०१/१०/२०२१ त्यावरी व्याज ६० दिवसाचे आत भरणा करणेची मागणी केलेली होती.

परंतु ज्या अर्थी वर उल्लेख केलेले कर्जदार श्री.उपाध्ये आरती महेंद्र आणि त्यांचे जामीनदार यांनी नोटिसीमध्ये मागणी केलेल्या रकमेचा भरणा केलेला नसल्याने उपरोक्त कर्जदार व त्यांचे जमीनदार आणि तमाम लोकांना कळविण्यात येते कि, सीक्युरिटायझेशन कायदा कलम १३(४) व नियम ८ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार खाली सही करणारे प्राधिकृत अधिकारी यांनी खाली उल्लेख केलेल्या मिळकतीचा **प्रतीकात्मक ताबा दिनांक १६ एप्रिल २०२४** रोजी घेतला असून विशेषतः उपरोक्त कर्जदार, जामीनदार व अन्य आणि सामान्य तमाम जनतेस कळविण्यात येते कि, सदर मालमत्तेबाबत कसलाही व्यवहार करण्यात येऊ नये आणि सदर मालमत्तेच्या कोणत्याही व्यवहारावर नगर अर्बन को-ऑप. बँक ली. अहमदनगर (मल्टि स्टेट शेड्युल्ड बँक) यांची घरबांधणी कर्जाकरिता दिनांक ३०/०९/२०२१ ची येणेबाकी रक्कम रूपये ४२,४८,८४५/- (अक्षरी बेचाळीस लाख अठ्ठेचाळीस हजार आठशे पंचेचाळीस फक्त ) + ०१/१०/२०२१ त्यावरील होणारे व्याजच्या रक्कमेसह बोजा राहील.

**अ ) कर्जदार सौ. उपाध्ये आरती महेंद्र यांच्या नावावरील असलेल्या अचलमालमत्तेचे वर्णन:-**

१) जिल्हा अहमदनगर ,पोटतुकडी व तालुका नगरपैकी, महानगरपालिका हद्दीतील मौजे चाहुराणा बुद्रुक येथील खालील मिळकत वर्णन सर्व्हे नंबर ५४/२,प्लॉट नंबर २१,चे ३५६.८८ चौ.मी.तसेच स्टिल्ट ग्राउंड फलोअरमधील निवासी सदनिका (फलॅट) नं.२ याचे फलॅट कारपेट क्षेत्र ३३.५६ चौ.मीटर याचे बिल्टअप क्षेत्र ३७.४३ चौ.मी.,कॉमन स्टेअरकेस,लिफट व पॅसेज कारपेट क्षेत्र ५.२७ चौ.मी.,याचे बिल्टअप ५.३३ चौ.मी.असे एकुण कारपेट क्षेत्र ३८.८३ चौ.मी. याचे बिल्टअप क्षेत्र ४२.७३ चौ.मी.व बाल्कनी कारपेट क्षेत्र ७.७५ चौ.मी.याचे बिल्टअप क्षेत्र ८.९४ चौ.मी. असे.यांसी चतु:सिमा खालीलप्रमाणे-

**पुर्वेस:-** लिफ्ट व फलॅट नं.३ **दक्षिणेस:-** स्टेअर केस व लिफ्ट
**पश्चिमेस:-** लिफ्ट व फलॅट नं.१ **उत्तरेस:-** प्लॉट साईड मार्जिन

दिनांक :-१६/०४/२०२४
ठिकाण : मु.पो चाहुराणा बुद्रुक,
तालुका- नगर,
जिल्हा- अहमदनगर

**प्राधिकृत अधिकारी**
नगर अर्बन को. ऑप.बँक
(मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक)
केंद्राशासानाधिन अवसायाना अंतर्गत, अहमदनगर.


आपल्या उज्वल भविष्यासाठी आजच गुंतवणूक करा

व्ही गार्डचा सोलार वॉटर हिटर घेऊन या.. वीज बिलात बचत करून आपले भविष्य सुरक्षित करा...

देशात सर्वाधिक विक्री होणारे व्ही गार्ड सोलार वॉटर हिटर

SS 304 L टँक
उत्तम दर्जाचे PUF इन्शुलेशन
60 LS 5000 LPD
उपलब्ध प्रेशराइज्ड मॉडेल्स उपलब्ध




V-GUARD Solar Water Heater
V-GUARD Solar Water Heater MNES Approved

- अधिकृत विक्रेते -
प्रोप्रा. मिलिंद गंधे
आदित्य एन्टरप्रायजेस्
गुलमोहोर रोड, सावेडी, अ. नगर.
9325103781
(*अटी लागू)